


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १९.०६.२०२५ | अंक नं. ६९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# पावसाळ्यातही बसस्थानकात 'प्रवाशांचे हाल'

## पुरेशी पर्यायी व्यवस्था नसल्याने पावसात भीजत करावी लागतेयं बसेसची प्रतीक्षा

नगर – महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या अहिल्यानगर शहरामधील मध्यवर्ती बसस्थानकाची मुख्य इमारत नूतनीकरणासाठी जमीनदोस्त करण्यात आलेली आहे. मात्र हे करताना पुरेशी पर्यायी व्यवस्था न केल्यामुळे सध्या पावसाळ्यात प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. पावसात भीजत प्रवाशांना बसेसची वाट पहावी लागत आहे. याचे लोकप्रतिनिधी, मंत्री, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांना काहीच सोयर सुतक नसल्याचे दिसत आहे. एस टी बसने प्रवास करणारे हे सर्वसामान्य नागरिक असतात, त्यामुळे सरकार कोणाचेही असले तरी सर्वसामान्यांच्या वाट्याला नेहमी हालअपेष्टाच असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

अहिल्यानगरमधील मध्यवर्ती बसस्थानकाची इमारत ६ महिन्यांपूर्वी नूतनीकरणासाठी पूर्णपणे पाडण्यात आली. आता त्या ठिकाणी भव्य आणि सुसज्ज असे बसस्थानक उभारले जाणार आहे, ही आनंदाची बाब आहे. परंतु या महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणचे मध्यवर्ती बसस्थानक जमीनदोस्त करण्यापूर्वी पुरेशी पर्यायी व्यवस्था होणे आवश्यक होते. त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून तातडीने फक्त बसस्थानक जमीनदोस्त करण्यात आले आणि मागील ६ महिन्यांमध्ये झालेली बसस्थानक इमारत बांधकामाची प्रगती पाहता दोन वर्ष तरी ते पूर्ण होईल, असे वाटत नाही.

गर्दीचे ठिकाण असलेल्या या मध्यवर्ती बसस्थानकामध्ये किमानपक्षी सावलीसाठी तसेच पावसापासून संरक्षण होण्यासाठी पत्र्याचे अस्थायी शेड उभे करणे अपेक्षित होते, ते देखील केले गेले नाही. उन्हाळ्याच्या दिवसांत प्रवाशांनी मोठा त्रास सहन केला होता. आता पावसाळा सुरु झाला आहे. सध्या पर्यायी व्यवस्था म्हणून ५० लोकदेखील उभे राहू शकणार नाही, अशा प्रकारचे एक शेड एका

*(मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

### राज्यकर्त्यांना सर्वसामान्यांची फक्त निवडणुकीत मते लागतात

शासन, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नेहमीच सर्वसामान्य माणूसच भरडला जात आहे. लोकप्रतिनिधी यांना या सर्वसामान्य माणसाची केवळ निवडणुका आल्यावरच आठवण होते. त्यावेळी सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून आम्ही काय योजना आणल्या, यापुढे काय काय करणार? याबाबतची भाषण बाजी केली जाते. एकदा निवडणुका संपल्या की, हा सर्वसामान्य माणूस कसा जगतोय, काय हाल अपेष्टा निमुटपणे सहन करतोयं? याकडे पहायला कोणत्याही राजकीय नेत्याला, लोकप्रतिनिधीला वेळ मिळत नाही. या सर्वसामान्य माणसाची आठवण त्यांना पुढच्या निवडणुकीच्या वेळीच होते, ही अतिशय विदारक परिस्थिती आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाकडे हतबलता व्यक्त करण्याशिवाय दुसरे काहीच नसते, हेही अतिशय खेदजनक आहे.






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



### मद्यपींना खुषखबर...

अमेरिकेचे तत्कालीन शेअर प्रोकर बिल डब्ल्यू व शल्यकर्म विशारद डॉ. बॉब दारूच्या आहारी गेले होते. कर्मधर्म संयोगाने त्यांची गाठ पडली होती. त्यांनी आपापल्या व्यसनाविषयी उपायांवर चर्चा चालू केली. बऱ्याच वेळा चर्चा करूनही काही सापडेना... पण अचानक त्यांना समजले या चर्चेच्या काळात दारू पिण्याची आठवणही दोघांना झाली नाही.

मद्यपी व्यसनींच्या एकमेकांशी चर्चेदरम्यान दारू पिण्याची अविवेकी ओढ आपण रोखू शकतो हा नवीन विचार जन्माला आला आणि यातूनच १० जून १९३५ मध्ये 'अल्कोहोलिक्स अनॉनिमस्' (ए.ए.) संघटनेचा जन्म झाला. ९० वर्षे पूर्ण झालेल्या या संघटनेमुळे मद्यपींना उमजलेले अन् उलगडलेले कोडे सुटू शकते.

या ए. ए. संघटनेचा भारतात श्रीगणेशा ५ मे १९५७ मध्ये झाला. आज भारतात एक हजारापेक्षाही अधिक ए.ए. समूह आहेत. ए.ए.च्या केंद्रीय कार्यालयाची स्थापना १९८८ मध्ये भायखळा मुंबई येथे झाली.

मद्य व्यसन लागलेल्या १०० जणांनी १९४० मध्ये 'अल्कोहोलिक्स अनॉनिमस' या नावाचे पुस्तक लिहिले.

दारू पिण्यापासून स्वतःला दूर ठेवणे व ज्यांना दारू पिण्यापासून दूर होण्याची इच्छा आहे त्यांना मदत करणे हे ए.ए. चे ध्येय असून, दारुड्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडविणे असे अंतिम उद्दिष्ट आहे. तसेच ही ए.ए. संघटना दारू समस्येशी निगडित अन्य संस्था, संघटनांशी सहकार्य करते.

मर्यादित, माफक मद्यसेवन योग्य असे काही तज्ज्ञ मानतात तरीपण दारू पिणे हा शारीरिक व मानसिक आजार आहे हे आता जागतिक आरोग्य संघटनेने मान्य केले आहे. ए.ए. या विश्वव्यापी संघटनेचा 'जगा आणि जगू द्या' या दिशेने सुरू असलेला प्रवास निर्विघ्नपणे पार पाडत जाओ याच सदिच्छा.

**(संदर्भ : डी. बी. महाजन)**

## आजारी अवस्थेत आढळलेल्या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर – कायनेटिक चौक ते अरणगाव जाणाऱ्या रोडच्या कडेला रेल्वे उड्डाणपुलाखाली आजारी अवस्थेत मिळून आलेल्या ६० वर्षीय अनोळखी इसमास सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही घटना १३ जून रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे. या इसमाची ओळख पटलेली नाही. मृत इसमाची उंची १६१ सें.मी. शरीरबांधा सडपातळ, चेहरा उभट, वर्ण सावळा, नाक मोठे, केस पांढरे, दाढी मिशा पांढरी, अंगात पेहराव ग्रे रंगाची जीन्स पॅन्ट, गडद रंगाचा हाफ बाहीचा टी–शर्ट असे आहे या इसमास कोणी ओळखत असेल अगर त्याच्याबाबत काही माहिती असल्यास त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे फोन नंबर ०२४१ २४१६ ११७ या फोनवर संपर्क करावा असे आवाहन तपासी अंमलदार योगेश कवाष्टे यांनी केले आहे.

## प्रा.डॉ.वसंतराव जोशी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील रिद्धी– सिद्धी कॉलनी मधील रहिवासी नगर येथील बी एड कॉलेजचे माजी प्राध्यापक डॉ. वसंत गोपाळ जोशी (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. नगर अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व.जोशी हे शांत, संयमी व शिस्तप्रिय शिक्षक, मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. शहरातील भुलतज्ञ डॉ. ललितराम जोशी यांचे ते वडील होत.

## ओमप्रकाश सोनग्रा यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – काळूबागवान गल्ली येथील रहिवासी ओमप्रकाश जेठमलजी सोनग्रा (वय ६०) यांचे १० जून रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ भाऊ, भावजया, १ मुलगा, २ मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सर्जेपूरा येथील प्रकाश सिट कव्हर्सचे संचालक होते.

## ताराबाई निकम यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – खडकी तालुका, अहिल्यानगर येथील रहिवासी ताराबाई पोपटराव निकम (वय ७४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ विवाहित मुलगा, ३ विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. खडकी येथील शेतकरी भारत निकम यांच्या त्या आई होत.

## गंगुबाई खांदवे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी गंगुबाई गोविंद खांदवे (वय ९०) यांचे १८ जून रोजी निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

महादेव खांदवे व बाळासाहेब खांदवे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# भ्रष्टाचाराच्या कीडपासुन अहिल्यानगर शहर वाचवायचे असेल तर आगामी मनपा निवडणुकीत महायुतीचा पराभव करावाच लागेल

नगर – गेली सहा दशक महाराष्ट्रात आणि चार दशकं अहिल्यानगर शहरामध्ये शिवसेनेचा झंझावात सर्वसामान्य माणसाच्या न्याय हक्कांसाठी घोंगावतो आहे. शहरातील सर्व घटकांच्या हिताच्या संरक्षणाकरिता आणि विकासाकरिता शिवसेनेने, शिवसैनिकांनी लोकांच्या पाठिंब्यावर तीव्र लढा उभारला. काळ पुढे सरकत राहिला. मात्र शिवसेनेचा समाजसेवेचा विचार आजही अढळपणे काम करतो आहे. शहराची नियोजनशून्य वाटचाल, त्यातून झालेली वाताहात, मनपाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड, याला लगाम घालत शहर वाचवायचं असेल तर आगामी मनपा निवडणुकीत महायुतीचा पराभव नगरकरांच्या पाठिंब्याने ठाकरे शिवसेनेला करावाच लागेल, असे प्रतिपादन शहर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.



शिवसेनेच्या स्थापनेला ५९ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त ठाकरे शहर शिवसेनेच्यावतीने अनाम प्रेम संस्थेतील दिव्यांग, अंध बांधवांना फळ, खाऊ वाटप करून स्थापना दिन साजरा करण्यात आला.

पक्षाच्या स्थापनेला आज ५९ वर्षे पूर्ण झाली. वर्धापन दिना निमित्त ठाकरे शहर शिवसेनेच्यावतीने अनाम प्रेम संस्थेतील दिव्यांग, अंध बांधवांना फळ, खाऊ वाटप करून स्थापना दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, कामगार आघाडीचे नेते विलास उबाळे, शहर कामगार सेना प्रमुख गौरव ढोणे, युवा सेना अहिल्यानगर विधानसभा युवा अधिकारी आनंद राठोड, सुनील भोसले, व्यापारी आघाडीचे महावीर मुथा, ओबीसी आघाडीचे गणेश आपरे, किशोर कोतकर, सामाजिक न्याय विभागाचे विकास भिंगारदिवे, बबन आढाव, जयराम आखाडे, बाबासाहेब वैरागर, मागासवर्गीय विभागाचे रोहिदास भालेराव, देवराम शिंदे, दीपक काकडे, आकाश आल्हाट, आनंद जवंजाळ आदी उपस्थित होते.

किरण काळे म्हणाले, मराठी माणसाचा आवाज बुलंद करण्यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी १९६० मध्ये सर्वप्रथम मार्मिकची स्थापना केली. सामान्य मराठी माणसाची तगमग आणि बाळासाहेबांची तळमळ यातून १९ जून १९६६ ला शिवसेनेचा जन्म झाला. तेव्हापासून गेली अनेक दशकं या महाराष्ट्रात ठाकरी बाणा गरजतोय. १९९५ मध्ये मराठी माणसाच्या आशीर्वादानेच महाराष्ट्रामध्ये शिवसेनेच शिवशाही सरकार आलं. शिवसेना सामान्य माणसाचा आधार बनली.

काळे पुढे म्हणाले, महाराष्ट्रात शिवसेनेने कायम संघर्ष केलाच. पण अहिल्यानगर शहरात देखील शिवसेना कायम संघर्षाच्याच भूमिकेत राहिली. हा संघर्ष सर्वसामान्य माणसासाठी, या शहराला दहशतमुक्त करण्यासाठी, शहराच्या प्रगतीसाठी, गोरगरीब, दीन दुबळ्यांचे अश्रू पुसण्यासाठी, व्यापारी, उद्योजकांना पाठबळ देण्यासाठीचा संघर्ष शिवसेनेने या शहरात स्व. अनिलभैय्या यांच्या नेतृत्वाखाली केला. स्व. राठोड यांची उणीव आज ही निश्चितच आहे. ती केवळ शिवसैनिकांनाच नव्हे तर तमाम नगरकरांच्या मनामध्ये आहे. पण शिवसेना कधी रडगाणं गात नाही. त्यामुळे ही उणीव भरून काढायची असेल तर त्यांनी घालून दिलेल्या प्रामाणिकपणाने राजकारण, समाजकारण करण्याच्या विचारावर चालत राहून काढावी लागेल. नगरकरांसाठी आजही शिवसेना तितक्याच ठामपणे उभी आहे, हा विश्वास या शहरातील जनतेच्या मनात आहे आणि तो जपण्याचं काम आम्ही शिवसैनिक सातत्याने करत राहू, असा विश्वास यावेळी काळे यांनी व्यक्त केला.

### राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीतील घटक पक्षांनी संपूर्ण नगर शहराचे तीन तेरा, नऊ बारा वाजलेत

सरकार निवडणुकांना घाबरतय. म्हणून निवडणुका त्यांनी अनेक वर्ष टाळल्या. पण आता सर्वोच्च न्यायालयाच्या रेट्यामुळे त्या होऊ घातल्यात. मात्र प्रशासक राजच्या माध्यमातून शहरात सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि महायुतीतील घटक पक्षांनी संपूर्ण शहराचे तीन तेरा, नऊ बारा वाजवले आहेत. शहरातील विकास कामांचे कोणतेही नियोजन नाही. ऐन पावसाळ्यात संपूर्ण शहर खोदून ठेवले आहे. या शहरातील व्यापारी, उद्योजक, चाकरमानी, हातावर पोट भरणारा, प्रत्येक घटक यामुळे बेजार झाला आहे. नियोजनशून्य कारभार करणाऱ्या आणि भ्रष्टाचार करून शहराची लाईफलाईन असणाऱ्या महानगरपालिकेला महायुतीने गिळंकृत केले आहे. नगरकरांच्या पाठिंब्याने शहर वाचविण्यासाठी आगामी मनपा निवडणुकीकरिता ठाकरे शिवसेना सज्ज असल्याचे, यावेळी किरण काळे म्हणाले.

# वर्धापनदिनी महापालिकेवर भगवा फडकविण्याचा शिवसेनेचा संकल्प

### श्री विशाल गणपती मंदिरात आरती; नागरिकांसह कार्यकर्त्यांना पेढे वाटप

नगर – शहरात शिवसेनेचा ५९ वा वर्धापन दिवस १९ जून रोजी साजरा करण्यात आला. ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात आरती करुन माळीवाडा वेस येथे नागरिकांसह कार्यकर्त्यांना पेढे वाटप करण्यात आले. शिवसैनिकांनी घोषणाबाजी करुन महापालिकेवर भगवा फडकविण्याचा संकल्प केला. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहर प्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, दिलीप सातपुते, माजी महापौर सुरेखा कदम, रोहिणी शेंडगे, माजी पंचायत समिती सभापती रामदास भोर, संजय शेंडगे, माजी नगरसेवक आप्पा नळकांडे, दत्ता कावरे, अनिल लोखंडे, दत्ता जाधव, संतोष ग्यानप्पा, दीपक खैरे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, महेश लोंढे, सुनील लालबोंद्रे, रवींद्र लालबोंद्रे, ओमकार शिंदे, पारुनाथ ढोकळे, अजित दळवी, अभिषेक भोसले, अशोक दहिफळे, विशाल शितोळे, दशरथ शिंदे, सचिन लोखंडे, विनोद गायकवाड, संग्राम कोतकर, अक्षय भिंगारे, सुनील भिंगारदिवे, अभिजीत तांबडे, घनश्याम घोलप आदी उपस्थित होते.



शहरात शिवसेनेचा ५९ वा वर्धापन दिवस १९ जून रोजी ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात आरती करुन माळीवाडा वेस येथे नागरिकांसह कार्यकर्त्यांना पेढे वाटप करून साजरा करण्यात आला.

सचिन जाधव म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने स्व. बाळासाहेब ठाकरे व प्रबोधनकार ठाकरे यांनी शिवसेनेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या विचाराने हिंदुत्वाचा वारसा घेऊन वारसा घेऊन शिवसेना पुढे जात आहे. सर्वसामान्यांना न्याय देऊन त्यांच्या हातात सत्ता देण्याचे काम शिवसेनेने केले. आजही शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्यांसाठी कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

अनिल शिंदे यांनी हिंदुत्वाचे ज्वलंत विचार घेऊन एकनाथ शिंदे स्व. बाळासाहेब ठाकरे व प्रबोधनकार ठाकरे यांचा वैचारिक वारसा चालवत आहे. मुख्यमंत्री असताना त्यांनी केलेल्या कामातून शिवसेनेची खरी ओळख जनतेला पटली आणि जनतेचे त्यांचे नेतृत्व मान्य करुन विधानसभेत मोठ्या संख्येने शिवसेनेचे उमेदवार निवडून दिल्याचे त्यांनी सांगितले.

संभाजी कदम म्हणाले की, देशाच्या इतिहासात नोंद घेण्यासारखे शिवसेनेचे कार्य आहे. शिवसेनेच्या माध्यमातून स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसांमधील स्वाभिमान जागा करुन त्यांना उभे करण्याचे काम केले. आजही तो वारसा व विचाराने शिवसेना कार्य करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# रस्त्याच्या कामातील हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी झाल्या नापीक

### बोंबाबोंब आंदोलन करण्याचा शेतकऱ्यांनी दिला इशारा

नगर – पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून सुपा (ता. पारनेर) ते पिंपळगाव कौडा (ता. नगर) येथे झालेल्या दोन वर्षांपूर्वी रस्त्याच्या कामात हलगर्जीपणा झाल्याने भर पावसाळ्यात शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक झाल्या आहेत. त्याची सखोल चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या मुख्य कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन करण्याचा इशारा संदीप कोल्हे, डॉ. शुभम शिंदे, कामरगावचे माजी सरपंच तुकाराम कातोरे यांनी दिला आहे.



सुपा ते पिंपळगाव कौडा रस्त्याच्या कामातील हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक झाल्या असून यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे कनिष्ठ अभियंता राहुल मिसाळ यांच्याकडे करताना संदीप कोल्हे, डॉ. शुभम शिंदे, तुकाराम कातोरे व शेतकरी.

सन २०२३ ते २०२४ मध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून सुपा ते पिंपळगाव कौडा हा पारनेर – नगर तालुका जोडरस्ता झाला आहे. सदरहू रस्त्याचे काम करताना गट नंबर ४७१, ४७२, ४७३ मध्ये शेतात साचणाऱ्या पावसाच्या पाण्याला वाहते करून देण्यासाठी रस्त्याच्या खालून मोरी काढली नाही. पूर्वी त्या ठिकाणी सदरहू शेतातील पाणी रस्त्याच्या पलीकडे जाण्यासाठी पानतास होते. शेतात पाणी साचत नव्हते आता मात्र संबधित शेतकऱ्याने पाणी वाहते करण्यासाठी मागणी करूनही काम अपूर्ण ठेवले आहे. परिणामी रस्त्याच्या पूर्वेला पावसाचे पाणी शेतात साचून शेतांना तळ्याचे स्वरूप आले आहे. शेतातील उभे पिके पाण्याखाली असून शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

संबधित ठेकेदाराकडून ८ दिवसात काम पूर्ण करून न घेतल्यास पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या कार्यालयापुढे १०० शेतकरी बोंबाबोंब आंदोलन करतील असा इशारा संदीप कोल्हे, डॉ. शुभम शिंदे, तुकाराम कातोरे यांच्यासह सुधीर जगताप, संदीप पवार, सुनील नलगे, प्रविण पवार, ज्ञानेश्वर पवार, छगन कोकाटे, धोंडीभाऊ कोल्हे यांनी दिला आहे.

याबाबत शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने नुकतीच पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे कनिष्ठ अभियंता राहुल मिसाळ यांची भेट घेऊन निवेदन दिले. सदरहू कामाचा एक वर्षापासून पाठपुरावा करत असून राजकीय हस्तक्षेपामुळे ठेकेदार चालढकल करत आहे. त्यांनी कोणत्या राजकीय नेत्याचा हस्तक्षेप आहे हे आंदोलनावेळी जाहीर करावे अन्यथा आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशाराही संदीप कोल्हे यांनी दिला आहे.





पुरेशी पर्यायी व्यवस्था न करता बसस्थानकाची इमारत जमीनदोस्त केल्याने भर पावसात बसेसची वाट पाहत थांबलेले प्रवाशी छायाचित्रात दिसत आहेत.

## बसस्थानकात 'प्रवाशांचे हाल'

(पान १ वरुन)

कोपऱ्यात आणि एसटी बस जेथे थांबतात त्याच्या विरुद्ध दिशेला उभे करण्यात आलेले आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना पावसात भीजतच बसेसची वाट पहावी लागत आहे.

वेळोवेळी महामंडळाने तिकिटामध्ये दरवाढ करून आणि सेवा देण्याचे बाबत मात्र अधोगती करून सामान्य प्रवाशांचे कंबरडे आधी मोडलेले आहेच. शिवाय शासनाची देखील या सार्वजनिक वाहतूक प्रणालीबाबत असलेली उदासीनता पाहता, इतर राज्यांच्या सार्वजनिक वाहतूक प्रणालीच्या जवळपास देखील आपण पोहोचू शकू असे वाटत नाही, याबाबत अहिल्यानगर हे शासन, प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांची असलेली उदासीनता यामुळे कायमच कमनशिबी ठरलेले आहे.

# शिक्षक विरोधी शासन निर्णय रद्द करण्यासाठी धरणे आंदोलन

### त्या शासन निर्णयाने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सेवा सुरक्षितता धोक्यात आल्याचा आरोप

नगर – शिक्षक विरोधी शासन निर्णय रद्द करण्यासाठी जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाच्यावतीने जिल्हा परिषदेत माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. विविध शासन निर्णयाने शिक्षण व शाळांचे भवितव्य उध्वस्त होत असताना हे शासन निर्णय त्वरीत रद्द करण्यासाठी निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात राजेंद्र लांडे, आप्पासाहेब शिंदे, उद्धवराव गुंड, शिरीष टेकाडे, रमजान हवालदार, महेंद्र हिंगे, राजेंद्र खेडकर, अशोक सोनवणे, विवेक अटपाडकर, वैभव सांगळे, सुरज घाटविसावे, ज्ञानदेव बेरड, ए. के. पवार, आर. एल. आरोटे, बी. के. कानवडे, ए. आर. पवार, रवी गावडे आदी सहभागी झाले होते.



शिक्षक विरोधी शासन निर्णय रद्द करण्यासाठी जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाच्यावतीने जिल्हा परिषदेत माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

काही चुकीच्या शासन निर्णयामुळे राज्यातील खाजगी, मान्यताप्राप्त, अनुदानित माध्यमिक शाळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सेवा सुरक्षितता धोक्यात आलेले आहेत. वेतनविषयक घातक वर्णाश्रमही निर्माण झालेले आहेत. ० टक्के वेतनापासून अनिश्चित काळासाठी २० ते १०० टक्के वेतन अनुदान टप्प्यावर वेतन घेणारे शिक्षकाचे सामाजिक विषमतेचे धक्कादायक वास्तव राज्यातील शिक्षण क्षेत्रात निर्माण होत असल्याचे म्हटले आहे.

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ चे तरतुदीचा चुकीचा अर्थ लावून वर्ग पटसंख्या, नैसर्गिक तुकडीवाढ व शिक्षक संख्येचे प्रमाण यात अशैक्षणिक बदल करण्यात आले. त्यामुळे शिक्षक संख्या कपातीचे संकट ओढवले आहे. म्हणून प्रत्येक वर्ग–तुकडी व त्यानुसार शिक्षकांचे पूर्वीप्रमाणे १.२५, १.५० शिक्षकांचे प्रमाण पनस्थापित करण्यात यावे. अनुदान धोरण रद्द करून पूर्वीप्रमाणे शाळेच्या मान्यतेपासून दरवर्षी २० ते १०० टक्के वेतन अनुदान लागू करण्यासंबंधीचे सूत्र पुनर स्थापित करण्यात यावे. वेतन अनुदान देता हा शासनाच्या मर्जीचा विषय होता कामा नये.

राज्यातील मोठ्या प्रमाणातील शाळा शून्य शिक्षकी होत आहेत. यामध्ये सर्वसामान्य गरीब पाल्यांच्या शिकण्याचा अधिकार व हक्क हिरावला जात आहे. राज्यातील अधिनियमित कला व क्रीडा तसेच कार्यानुभ विषयांसाठी शिक्षकांची स्थायी पदे उपलब्ध असतानाही त्या पदावर कायमस्वरूपी कंत्राटी मानधन पद्धतीने शिक्षक भरती करणे अशैक्षणिक असल्याचे संघटनेच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

यासाठी संच मान्यता व अनुषंगिक विषयीचे २८ एप्रिल २०१५ चे परिपत्रक, खाजगी माध्यमिक शाळांसाठीचे नियमित अनुदान प्रदान धोरणातील बदलाबाबत २ जुलै २०१६ चे परिपत्रक, संच मान्यतेसंबंधीच्या निकषाबाबत १५ मार्च २०२४ चे परिपत्रक व इयत्ता ६ वी ते ८ वीसाठी कला क्रीडा व कार्यानुभव या विषयांसाठी कंत्राटी मानधन तत्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत ५ जून २०२५ चे परिपत्रक रद्द करण्याची मागणी जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांनी आंदोलन स्थळी येऊन स्विकारले.

# गृहिणी

## आरोग्य

### रिकाम्या पोटी प्या दही

दही आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे असे फार पूर्वीपासून मानले जात आहे. दह्यात निरोगी बॅक्टेरिया आढळतात जे तुमच्या आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. सकाळी रिकाम्या पोटी दही खाल्ल्याने अनेक शारीरिक आणि मानसिक फायदे मिळतात. दह्यात प्रोबायोटिक्स, प्रथिने, कॅल्शियम आणि इतर पोषक घटक आढळतात. यासोबतच, त्याचे सेवन आरोग्यासाठी चांगले असते कारण ते पचन सुधारणे, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, हाडे मजबूत करणे आणि त्वचेचे आरोग्य सुधारणे असे अनेक फायदे देते. असे मानले जाते की दह्यामध्ये कॅल्शियम आढळते जे आपल्या हाडांसाठी आवश्यक आहे. जर तुम्हाला तुमची हाडे मजबूत करायची असतील तर तुम्ही दररोज रिकाम्या पोटी दही खाऊ शकता. दह्यामध्ये प्रोबायोटिक्स असतात जे पोटातील चांगले बॅक्टेरिया वाढविण्यास मदत करतात. जर तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दही खाऊ शकता. यामुळे बद्धकोष्ठता, अपचन इत्यादींपासून आराम मिळू शकतो.

## पाककला

### बेसन बर्फी

**साहित्य :** १ कप बेसन, १/३ कप (६ टेबलस्पून) तूप, ३/४ कप साखर, ३/४ कप दूध, वेलचीपूड, ड्रायफ्रूट्स,

**कृती :** पॅनमध्ये बेसन चाळून घ्या, त्यात तूप घालून मंद आचेवर ब्राउन होईपर्यंत भाजा. आता त्यात साखर घालून मिक्स करा. नंतर थोडं थोडं दूध घालून मिक्स करा. मिश्रण पूर्णपणे आळले की वेलचीपूड, ड्रायफ्रूट्स घालावे. टिनला तूप लावून त्यात हे मिश्रण ओता. सर्व बाजूने समान करून घ्या व त्यावर ड्रायफ्रूट्स घालून दाबून घ्या. सुरीने वड्या पाडा. सेट होण्यास अर्धा तास फ्रीजमध्ये ठेवा. वड्या सुट्या करून सजवा, तयार आहे बेसन बर्फी.

## वास्तू

### पवित्र पारिजात

❋ पारिजाताचे वृक्ष जो कोणी घराभोवती लावेल त्याच्या घरात सर्व प्रकारचे वास्तू दोष निघून जातात.

❋ पारिजात फुलांचा उपयोग खास करून लक्ष्मीपूजनासाठी केला जातो परंतु फक्त तीच फुले वापरली जातात जी आपोआप झाडावरून खाली पडतात. जिथे हे वृक्ष आहे तेथेच साक्षात लक्ष्मीचा वास आहे.

❋ पारिजात फुलांच्या सुगंधात तुमच्या जीवनातून ताणतणाव दूर करण्याची शक्ती असते आणि केवळ आनंदच आनंद भरू शकतो. त्याचा सुगंध तुमच्या मेंदूला शांत करतो. घरात कुटुंबात आनंदी वातावरण टिकते आणि व्यक्ती दीर्घायुषी होते.

## सल्ला

❋ अननसाचा शिरा करताना त्याचे तुकडे साखरेत शिजवून मग शिऱ्यात घाला. त्यामुळे आंबटपणा येत नाही.

❋ कणिक शिजवताना अर्ध पाणी आणि अर्ध दूध घातल्यास पोळ्या मऊ होतात.

## सौंदर्य

❋ केमिकलयुक्त प्रोडक्टचा अधिक वापर केल्याने तुमच्या त्वचेचे अधिक नुकसान होऊ शकते. चमकदार तसेच ग्लोईंग त्वचेसाठी घरगुती फेस पॅक आणि फेस स्क्रबचा वापर करावा.

❋ दही मध एकत्र मिक्स करून चेहऱ्याला मसाज करा. यामुळे त्वचा अधिक चमकदार दिसू लागेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २० जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, रेवती २१।४५, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना काही पुरस्कार मिळू शकतात. परीक्षेचा निकाल चांगला मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल.

**वृषभ** : कोणतेही काम तुमच्या नशिबावर सोडू नका अन्यथा ते तुमच्यासाठी भविष्यात समस्या निर्माण करू शकते. गुंतवणुकीतून नफा होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी समस्यांनी भरलेला असणार आहे.

**मिथुन** : तुम्ही तुमच्या आरोग्याशी तडजोड करू नये आणि जर तुम्हाला पोटाशी संबंधित कोणत्याही समस्येचा त्रास होत असेल तर तुम्ही वैद्यकीय सल्ला घ्यावा. व्यावसायिक लोक काही नवीन यंत्रसामग्री आणू शकतात.

**कर्क** : आज तुमच्या सभोवतालचे वातावरण आनंददायी असणार आहे. जर तुम्ही आधी कोणतीही गुंतवणूक केली असेल तर ती तुम्हाला चांगला नफा देऊ शकते.

**सिंह** : पार्टनरशिप फायद्याची ठरेल. कौटुंबिक समस्या सुधारतील. तुम्हाला तुमच्या मित्रांशी बोलावे लागेल. तुम्ही व्यवसाय योजनांमध्ये सक्रियपणे सहभागी व्हाल.

**कन्या** : वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवा तुमचे काम वेळेवर पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही चिंतेत असाल ज्यामुळे तुमचा स्वभाव चिडचिडा होईल. अपूर्ण स्वप्ने पूर्ण होऊ शकतात. तुम्ही तणावाखाली असाल.

**तूळ** : आजचा दिवस तुमच्या आर्थिक स्थितीच्या दृष्टीने चांगला राहणार आहे. तुम्ही घरातील आणि बाहेरील कामात व्यस्त असाल.

**वृश्चिक** : तुमच्या मुलाच्या वागण्याबद्दल तुम्हाला काळजी असेल. तसेच तुम्हाला तुमच्या नातेवाईकांपैकी कोणाच्या आरोग्याबद्दल चिंता वाटत असेल तर त्यांचे आरोग्य सुधारू शकते.

**धनु** : तुमची काही अपूर्ण स्वप्ने पूर्ण होऊ शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर कुटुंबात पती-पत्नीमध्ये बराच काळ वाद सुरू असेल तर तुम्ही तो सोडवण्याचा आज प्रयत्न कराल.

**मकर** : तुम्ही मेहनत करूनच चांगले स्थान मिळवू शकाल म्हणून जर तुम्ही तुमच्या ध्येयांकडे दृढ राहिलात तरच तुम्ही ते साध्य करू शकाल.

**कुंभ** : ऑनलाइन काम करणाऱ्यांना चांगला धनलाभ होईल. तुम्ही दुसऱ्यावर अवलंबून राहण्याचे टाळले पाहिजे. आज कठोर परिश्रम करावे लागतील.

**मीन** : नोकरी करणारे लोक त्यांच्या कामाच्या ताणाबद्दल थोडे चिंतित असतील. तुम्हाला तुमच्या वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. ११९३ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | | ■ | ३ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ४ | |
| | ■ | ५ | | ६ | | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ७ | |
| ■ | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| ८ | | | ■ | | ■ | ९ | |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| ■ | ■ | १० | | ■ | ■ | ■ | ■ |

**आडवे शब्द :-** १) अपने (चित्रपटाचे नाव) ५) राजेश खन्ना, तनुजा यांचा ++ +++ शहर तुम्हारा एक चित्रपट ४) ++ (चित्रपटाचे नाव) ७) अमर ++ (चित्रपटाचे नाव) ८) 'तू चीज बड़ी है मस्त मस्त तू चीज' हे गाणे असलेला चित्रपट ९) हीरा ++ (चित्रपटाचे नाव) १०) एक दिवंगत अभिनेता - ++ कपूर

**उभे शब्द :-** १) कबीर बेदी, माधवी, फराह यांचा एक चित्रपट २) आशा पारेख, धर्मेंद्र यांचा एक चित्रपट ३) ++ मेरे सपने (चित्रपटाचे नाव) ४) ये ++ ++++ पढकर ये तुम नाराज ना होना ये तुम मेरी जिंदगी हो (गाणे) ६) ++ ++ + प्यार करेगा ओ गाना गायेगा दीवाना सैकडोंमे (गाणे) ८) अनमोल ++ (चित्रपटाचे नाव)

# ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : खोट्या वचनांपेक्षा स्पष्ट नकार नेहमी चांगला असतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कॅमेऱ्याचा विकास कसा झाला?

आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण कॅमेऱ्यात कैद करण्याची धडपड करणारे अनेक लोक आपण आजूबाजूला पाहत असतो. कुठल्यातरी फॅन्सी ठिकाणी जाऊन प्री-वेडिंग फोटोशूट करणाऱ्या जोडप्यांचा आणि फोटोग्राफर्सचाही सगळीकडे सुळसुळाट आहे. पण मुळात हा कॅमेरा आला कसा माहीत आहे? सुरुवातीच्या काळात फोटोग्राफी हा अत्यंत वेळकाढू आणि अंगमेहनतीचा प्रकार होता. धातू आणि लाकडापासून बनवलेले कॅमेरे काचेच्या किंवा धातूच्याच प्लेटवर फोटो घ्यायचे.

कधी कधी सगळी उपकरणं वाहून नेण्यासाठी प्राण्यांचा वापर करावा लागायचा! पण १८८८ साली जॉर्ज इस्टमन या अमेरिकन संशोधकानं शोधलेल्या फिल्ममुळे कॅमेराविश्वात क्रांती घडली. ही 'कोडॅक मोमेंट' पुढच्या सगळ्या संशोधनाची पायाभरणीच होती असं म्हणा ना!

२० व्या शतकाच्या सुरुवातीला आलेल्या 'कोडॅक ब्राऊनी' कॅमेऱ्यानं फोटोग्राफीच्या जगात लोकशाही आणली असं रॉयल फोटोग्रॅफिक सोसायटीचे महासंचालक डॉ. मायकल प्रिचर्ड म्हणतात.

त्यानंतर कॅमेऱ्याच्या क्षेत्रात झालेले बदल आपण पाहिलेच आहेत. ब्लॅक अँड व्हाईट कॅमेऱ्यात रंग आले, फिल्म्स (ज्याला आपल्याकडे बहुधा 'रोल' म्हणायचो) जाऊन डिजिटल कॅमेरे आले. कॅमेरे नसते तर सध्याचे सेल्फीग्रस्त विश्व कदाचित उभे राहिलेच नसते, नाही का? अर्थात, हे चांगलं की वाईट हे ज्यानं त्यानं आपापलं ठरवावं!

### कृपाचार्य

गौतम महर्षींना शरद्वान नावाचा एक पुत्र होता. त्याला जन्मतःच धनुर्विद्या अवगत होती. त्याची वेदाध्ययनात बुद्धी फारशी चालत नसे. तपश्चर्येच्या जोरावर जसे वेदांचे ज्ञान आत्मसात केले जाते, तसेच शरद्वानाने तपश्चर्या करुन सर्व अस्त्रांची प्राप्ती करुन घेतली. या त्याच्या कठोर तपश्चर्येमुळे व धनुर्विद्येतील प्रावीण्यामुळे इंद्राला आपल्या आसनाची काळजी वाटू लागली. त्याच्या तपात अडथळा आणण्यासाठी इंद्राने जानपदी नावाच्या अप्सरेची नेमणूक केली. ती जानपदी शरद्वानाच्या आश्रमापाशी जाऊन त्याला वश करुन घ्यायचा प्रयत्न करू लागली.

आपल्या तपसामर्थ्यामुळे बराच काळ शरद्वानाने आपल्या मनाला आवर घातला; पण कालांतराने तो जानपदीच्या मोहाला बळी पडला. त्या दोघांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली. ते जुळे त्यांनी गवताच्या बेटात ठेवले व जानपदी परत इंद्रलोकाला गेली. शरद्वान पुन्हा आपल्या कामाला लागला.

राजा शंतनू एकदा शिकारीसाठी अरण्यात गेला असता त्याच्या सैनिकाला गवताच्या बेटामध्ये ते जुळे दिसले. त्या जुळ्याजवळ धनुष्यबाणही होता. ही कोणातरी धनुर्धारी माणसाची मुले असली पाहिजेत, हे ध्यानात घेऊन सैनिकांनी त्यांना राजा शंतनूकडे नेले. ते धनुष्यबाणही त्याला दाखवले. राजाच्या मनात कृपा निर्माण झाली व ते जुळे घेऊन तो राजवाड्यात गेला. त्याने त्यांचा सांभाळ केला. त्याने मुलाचे नाव कृप व मुलीचे नाव कृपी असे ठेवले.

आपल्या मुलांचा सांभाळ राजा शंतनू करीत आहे हे शरद्वानास अंतर्ज्ञानाने समजले. लगेच तो शंतनूकडे आला आणि त्याने कृपाला आपले गोत्र तसेच इतर महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. त्याला धनुर्विद्येची दीक्षा दिली. धनुर्विद्येतील सर्व गूढ गोष्टी त्याला शिकवल्या. कृप थोड्याच काळात धनुर्विद्येत आचार्यपदाला पोचला. कौरव पांडव, यादव कुळातील अनेक वीरांनी कृपाचार्यांपासून धनुर्विद्येचे शिक्षण घेतले.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

यह सच है कि नैतिक जीवन के बिना कोई रूहानी तरक्की संभव नहीं है। जो कोई भी इन नियमों का पालन करता है, उसकी रूहानी तरक्की हो सकती है, चाहे वह अमीर हो या गरीब। लेकिन अमीर आदमी, औरों के मुकाबले, ऐसा फायदा कम उठाते हैं।

दयालु गुरु-शक्ति के कई प्रकार के आशीर्वादों के प्रति आपकी गहरी कृतज्ञता उल्लेखनीय है। यह दिव्य दया की ओर पहला कदम कि सदा बढ़ती हुई मात्रा में बालक रूपी शिष्य को भेजी जाती है।

हाँ, आप ठीक कहते हैं; शिष्य अपनी 'मैं' को खत्म करने के लिए जो भी कोशिशें करता है, वे सब सही हैं, क्योंकि अहंकार को खत्म करके ही हम जन्म-मरण के ना खत्म होने वाले चक्र से मुक्त हो सकते हैं।

यह अच्छा है कि सत्संग की बैठकें प्रेम और शांति से भरी होती हैं, हालाँकि इनमें बहुत ज्यादा लोग नहीं आते ।

कृपया आने वाले भाई-बहनों को नियमित रूप से सत्संग में आने और भजन-सिमरन करने की जरूरतों के बारे में बताएँ, जिनकी कि बड़ी भारी अहमियत हैं। अंतर में शांति देने वाली पवित्र वाणी और दिव्य ज्योति से अधिक से अधिक जुड़कर ही अत्याधुनिक विनाशकारी हथियारों की खोज से पैदा हुई भयावह बेचैनी और डर से छुटकारा पाया जा सकता १ धन्य हैं वे गिने चुने लोग, जिन्हें परा विद्या की पवित्र दीक्षा देकर निहाल किया गया १ अब यह उन पर है कि वे समय रहते इसका फायदा उठाएँ। उनकी भलाई इसी में है कि वे प्रेम पूर्वक कार्य करते रहें और दिन-ब-दिन तरक्की करें ।

मेरी सलाह है कि आप आज ही से प्रेम और आत्म समर्पण को अपने जीवन का आधार बना लें। यदि आप ऐसा करेंगे, तो आप पायेंगे कि आपकी जिंदगी रोज एक वरदान है यदि आप रूहानियत के रास्ते पर अच्छी खासी तरक्की करना चाहते हैं, तो आप अपने अंतर में सतगुरु के प्रति आत्मसमर्पण और प्रेम की भारी क्षमता का विकास करें। मैंने कई बार कहा है कि यह रास्ता आसान नहीं है। आपको अवश्य ही अपने अहंकार को सूली पर चढ़ाना होगा और अपनी मैं को प्रति अपने प्रेम की वेदी पर अर्पित करना होगा। सतगुरु

मुझे खुशी है कि आप सतगुरु से प्रेम करते हैं। प्रभु प्रेम है और सतगुरु प्रेम देहधारी है। उससे प्रेम की शुआएँ (किरणे) निकलती हैं, जिनसे जुड़कर वे लोग, जो रास्ते पर हैं या इस रास्ते को ढूँढ रहे हैं, फायदा उठा सकते हैं। वे लोग धन्य हैं, जिनके पात्र निर्मल और साफ हैं और जो सतगुरु की दया के मीठे अमृत को ग्रहण करने के लिए तैयार हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

गहरे ध्यान में भी आंखो का झपकाना बंद या बहुत कम हो जाता है। अगर हम आंखो का झपकाना रोक दें तो योग जैसी अनुभूति होने लगेगी। एकाग्रता बढ़ने लगेगी। खाना बनाते, खाना खाते, पानी, चाय, दूध आदि पीते या पढ़ते समय या जब कभी निराशा हो, गुस्सा हो, दिल में हार के विचार आ रहे हों या किसी बीमारी से परेशान हो तो पलकों के झपकाने पर नियंत्रण करें आप को सफलता मिलने लगेगी। आप अपने जीवन में आगे बढ़ सकेगें और अगर योगी हैं तो योग में आनंद आने लगेगा।

आज्ञा चक्र -

पीनियल ग्रंथी मेलाटोनिन हार्मोन

मेलाटोनिन हार्मोन दिमाग में स्वतः स्त्रावित होता है और चैन की नींद देता है। अगर इस हार्मोन का स्त्राव भरपूर न हो तो नींद न आने की समस्या होती है। सुबह की शानदार शुरुआत तभी हो सकती है। जब रात को चैन भरी नींद आये। अनियमित दिनचर्या, तनाव और अवसाद से इस का स्त्राव कम हो जाता है जिस से नींद दूर हो जाती है। नींद अच्छी नहीं आती है तो दिनचर्या को बदलें,

### आज्ञा चक्र

समय का पालन करें और कुछ दिन तकनीक से दूर रहें। नियमित व्यायाम करें और स्वस्थ खानपान अपनायें ।

मधुमेह, डिप्रेशन, उच्च व निम्न रक्तचाप, रक्त के थक्के एवम मिरगी के दौरों में मेलाटोनिन हार्मोन से आराम मिलता है। अगर बुरे सपने आते हैं तो मेलाटोनिन सप्लीमेंट लें। उदास मन, चिड़चिड़ापन, पुरुषों में स्तन वृद्धि तथा प्रजनन सम्बन्धी कमियों का मूल कारण मेलाटोनिन हार्मोन की कमी है। पीनियल ग्रंथि में विशेष प्रकार की कोशिकाएं होती हैं जो मेलाटोनिन हार्मोन पैदा करती हैं। ऐसी ही कोशिकाएं आंख की रेटिंना और शरीर की दूसरी त्वचा में भी पाई जाती हैं। सभी रोगों और दुखों का मूल कारण मेलाटोनिन हार्मोन की कमी है। जब व्यक्ति बहुत थका हुआ हो, किसी कारण से उसका मन टूटा हुआ हो, परेशान हो, कोई घातक रोग हो, भयानक पीड़ा हो या चीर फाड़ का कार्य करना हो तो रोगी को ऐसी दवाई देते हैं जिस से उसे नींद आ जाये। इस से एक फायदा तो यह होता है कि रोगी को कष्ट नहीं होता, दूसरा यह कि नींद में मेलाटोनिन हार्मोन पैदा होता है जो रोगों को ठीक करता है। आज मानव निर्मित मेलाटोनिन हार्मोन और सप्लीमेंट्स भी उपलब्ध हैं। ये फायदेमंद तो हैं परंतु डाक्टर की देख रेख में ही लेने चाहियें क्योंकि इन के बुरे प्रभाव होते हैं। कोई भी शारीरिक, मानसिक वा आध्यात्मिक पीड़ा है तो समझ लो मेलाटोनिन हार्मोन में कमी आ गई है। जिस की प्राप्ति का सहज उपाय है भरपूर गहरी नींद लें। एक और आसान तरीका यह है कि मन में दूसरों के प्रति चीटिंग के विचार त्याग दें। चीटिंग के विचार इस हार्मोन में बाधक बन जाते हैं।

आज्ञा चक्र -

१९ पीनियल ग्रंथि मेलेटोनिन - नेत्र

स्थूल आंखो का दिमाग में जो केन्द्र है उसके मूल में दिव्य नेत्र का केन्द्र है। इस नेत्र के जागने पर हर मनुष्य कमाल कर सकता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : देवा, जन्मोजन्मी मला हाच नवरा मिळू दे

नवरा : अरे वा ! इतका आवडतो मी तुला?

बायको : नाही हो, एवढं ट्रेनिंग दिलेलं वाया नाही का जाणार?

नवीन माणसाला परत कोण शिकवणार?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ इमानुएल ओडारड्रीगो यांची कोणत्या देशाच्या पंतप्रधानपदी निवड झाली आहे? - बुर्किना फासो

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

लहान मुलांसोबत आपण वेळ घालविला तर आपलेही दुःख, नैराश्य भावना कमी होते, मन प्रफुल्लित राहते. श्लोकच्या आईला, 'पुढच्या वेळी येताना श्लोकच्या बाबांनाही घेऊन ये' असे सांगितले. पुढच्या तपासणीला त्याचे बाबासुद्धा आले होते. दोघांनाही श्लोकशी सकारात्मक बोलायला सांगितले. तू असा वागू नको, आम्हाला त्रास देऊ नको असे नकारात्मक बोलणे टाळून, श्लोक खूप शहाणा मुलगा आहे. त्याची वस्तू तो जागेवर ठेवतो. त्याच्यासमोर तुम्हीपण प्रत्येक वस्तू जागेवर ठेवायला शिका. त्याने सर्व वस्तू जागेवर ठेवल्यावर त्याचे कौतुक करून एखादी भेटवस्तू त्या दिवशी त्याला द्या. त्याला प्रोत्साहन द्या, असे सांगितले. समजूतदारपणाने नीट शिकवायचा व वळण लावायचा प्रयत्न झाला, तर मुलाचा आत्मविश्वास नक्कीच वाढतो. तसेच तो इतरांवरही विश्वास ठेवायला शिकतो. शिस्त, नियम,

### बालकांचे आजार

वागणूक याचे अर्थ त्याला कळायला लागतात आणि ते पाळायचा आनंदही त्याला मिळतो. त्यामुळे मूल हळूहळू हसरे, खेळकर, आज्ञाधारक व समजूतदार होते. त्याची एकाग्रता वाढण्यासाठी दिवसातून दोन वेळा त्याच्याकडून ओंकारसाधना। करून घेण्यास सांगितली.

सोबत बुद्धिमत्ता वाढण्यासाठी आयुर्वेदिक औषधी योजना सुरू केली. शिरोधारा, नस्य हे पंचकर्मातील उपकर्म केले. एक महिन्यानंतर श्लोक त्याच्या आई-बाबांसमवेत आला. या वेळी तिघांच्याही चेहऱ्यावर । समाधान व आनंद दिसत होता. श्लोक आता बऱ्यापैकी शिस्तीत वागत होता. त्याची तपासणी झाल्यावर त्याची आई मला म्हणाली, डॉक्टर, आम्ही त्याला होस्टेलवर ठेवण्याचा निर्णय रद्द केला आहे. त्याच्यासोबत आम्ही पण अभ्यासाला बसत असल्यामुळे तो आता आनंदाने अभ्यास करतो. त्याच्या आईचे बोलणे ऐकून मला खुप समाधान वाटले. कारण माझ्या समुपदेशनान उपचारांनी एका बालकाचे फुलपाखराप्रमाणे बागडण्याच्या वयातील जीवन बंदिस्त होण्यापासून वाचले होते.

लहान वयातच बालिकेला संपूर्ण आहाराची सवय लावावी. कारण या वयातच नकळतच जिभेला लागलेली चव आयुष्यभर आवडते. एक-दोन वर्षाच्या बालिकेला पोळी-भाजी, वरण-भात, त्यावर साजूक तूप असा आहार द्यावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगर जिल्ह्यात योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम आणि पर्यावरणीय उपक्रम राबविणार

### मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांची माहिती; सर्व ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांचे सहकार्य घेण्यात येणार

नगर – जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)–२ अंतर्गत २१ जून रोजी होणाऱ्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांच्या सहकार्याने योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा व समुदायाच्या पुढाकारातून विविध पर्यावरणीय उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी एक दशक पूर्ण करत आहे. या निमित्ताने देशभरात विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हे उपक्रम १० विभागांमध्ये वर्गीकृत करण्यात आले आहेत.

**कार्यक्रम क्रमांक १ –** 'योग संगम' या अंतर्गत २१ जून रोजी सकाळी ६.३० ते ७.४५ या वेळेत प्रमुख योग सत्र होणार असून, पंतप्रधानांच्या उपस्थितीत विशाखापट्टणम् (आंध्रप्रदेश) येथील राष्ट्रीय कार्यक्रमाशी समांतरपणे हा कार्यक्रम होईल. योग संगम हे व्यापक जनसहभाग व योग प्रात्यक्षिकांची परंपरा पुढे नेण्यासाठी आयोजित केले आहे.

जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये हे कार्यक्रम संबंधित समित्यांच्या व 'आयुष्मान आरोग्य मंदिरां'च्या सहकार्याने आयोजित करण्यात येतील. यासाठी समित्यांनी क्यूआरकोड १ स्कॅन करून मानक कार्यप्रणाली, तर क्यूआरकोड २ स्कॅन करून संदर्भ साहित्य प्राप्त करावे.

**कार्यक्रम क्रमांक २ – 'हरित योग'** : या उपक्रमांतर्गत पारंपरिक योगाभ्यासासोबत पर्यावरण शाश्वततेवर भर दिला जाणार आहे. योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा व इतर पर्यावरणपूरक उपक्रमांचा समावेश असणार आहे. हे सर्व उपक्रम 'हरित योग' अंतर्गत एकत्रितपणे राबविले जातील. आवश्यक माहिती क्यूआरकोड ३ स्कॅन करून मिळवता येईल.


यावर्षी 'योग, आरोग्य आणि वॉश' (पाणी, स्वच्छता आणि आरोग्य) या संकल्पनेवर आधारित उपक्रम राबवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यामध्ये योग फॉर वेलबिइंग ॲण्ड वॉश संमेलनांचे आयोजन अशा ठिकाणी करणे अपेक्षित आहे, जिथे जल जीवन मिशन किंवा स्वच्छ भारत मिशन–२ अंतर्गत मालमत्ता उपलब्ध आहेत.

सर्व कार्यक्रम 'योग संगम' किंवा 'हरित योग' या मुख्य संकल्पनांशी सुसंगत असावेत.

कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला समित्यांनी संबंधित परिसर व पायाभूत सुविधा (पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य) स्वच्छ कराव्यात. लाभार्थ्यांच्या बैठका, विविध जागांवर योग सत्रांचे आयोजन, तसेच या उपक्रमांची छायाचित्रे नोंदवून दस्तऐवजीकरण करावे.

या कार्यक्रमात सर्व संबंधित घटकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, जिल्हास्तरावर त्याचा व्यापक प्रसार करावा, असे आवाहनही श्री.भंडारी यांनी केले आहे.

# आनंदधाममध्ये २१ जूनला जागतिक योग दिन कार्यक्रम



नगर – जैन सोशल फेडरेशन, आनंदऋषिजी योगा सेंटर, जैन श्रावक संघ, श्री ओसवाल पंचायत सभा, आनंदऋषिजी नर्सिंग कॉलेज आणि आनंदऋषिजी हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून रोजी आनंदधामच्या प्रांगणात सकाळी ६.३० ते ७.३० यावेळेत जागतिक योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती योग प्रशिक्षक अनिल मेहेर यांनी दिली.

ते म्हणाले, या कार्यक्रमात योग स्ट्रेचिंग, सूर्यनमस्कार, यासह पूरक व्यायाम तज्ज्ञांकडून सप्रात्यक्षिक करून घेण्यात येतील. याचवेळी प्रत्येक व्यायाम प्रकाराची शास्त्रोक्त माहितीही दिली जाईल. तसेच जिज्ञासूंच्या शंकांचे समाधानही करण्यात येईल. हा कार्यक्रमासाठी सर्व वयोगटासाठी खुला असून पूर्णपणे मोफत आहे.

योगाभ्यासाचे महत्व जागतिक पातळीवर पोहोचले आहे. शारीरिक तसेच मानसिक स्वास्थ्यासाठी योग प्राणायाम अतिशय उपयुक्त आहे. त्यादृष्टीने अधिकाधिक नगरकरांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्यावतीने अनिल मेहेर यांनी केले आहे.

आनंदऋषीजी ब्लड बँकेच्या तळमजल्यावर दररोज सकाळी ५.४५ ते ६.४५ यावेळेत सर्व वयोगटासाठी मोफत योग वर्ग चालविण्यात येतो. या नियमित योग वर्गाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जूनला 'एक पृथ्वी, एक स्वस्थ संसार'चे आयोजन




नगर – संत निरंकारी मिशन मार्फत आंतर्राष्ट्रीय योग दिवसाचे औचित्य साधून २१ जून रोजी देशभरात १००० पेक्षा अधिक ठिकाणी एकाच वेळी 'योग दिवस' आयोजित केला जाणार आहे. मिशनच्या विविध शाखांमध्ये हे आयोजन स्थानिक योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खुल्या प्रांगणात किंवा उद्यानांमध्ये करण्यात येईल, ज्यामध्ये निरंकारी भक्तगण, सेवादल स्वयंसेवक व स्थानिक नागरिक उत्साहाने भाग घेतील.

मंडळाच्या नगर शाखेच्या वतीने सुद्धा मिस्कीनरोड स्थित निरंकारी सत्संग भवन येथे सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत योग दिवसाचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये निरंकारी भक्तगणांसह इतर नागरिकांनीही सहभागी होऊन याचा लाभ घ्यावा, असे आवाहन निरंकारी मिशनच्या स्थानिक प्रबंधकांकडून करण्यात आले आहे.

या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय योग दिवसाचा विषय – 'एक पृथ्वी, एक स्वास्थ्य करिता योग' असा जाहीर केला आहे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिन्दर सुखीजाजी यांनी माहिती दिली, की २०१५ सालापासूनच संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशनद्वारे 'योग दिवस' नियमितपणे देशव्यापी स्तरावर आयोजित केला जात आहे. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आशीर्वादाने या उपक्रमाचा सातत्याने विस्तार होत आहे सतगुरु माताजींचे हेच मार्गदर्शन आहे, की 'स्वस्थ मन, सहज जीवन', योग ही भारतातील एक प्राचीन विद्या आहे जी केवळ शरीरालाच बलवान बनवते असे नव्हे तर मनाला शांती देते आणि आत्म्याला जागृत करण्याची क्षमता बाळगते याचा नियमित अभ्यास करुन मनुष्य तनाव, असंतुलन आणि रोग इत्यादींपासून स्वत:चा बचाव करुन आत्मिक शांती व सामाजिक सौहार्दाच्या दिशेने अग्रेसर होतो. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये अशा प्रकारच्या आयोजनाचा मूळ उद्देश हाच आहे, की आपण स्वत:च्या स्वास्थ्याला सर्वोच्च प्राथमिकता द्यावी आणि एक सुखद, संतुलित व शांतीपूर्ण जीवन जगण्याच्या दिशेने वळावे.

## अहिल्यानगर जिल्हा आयुष रुग्णालयात २१ जून रोजी योगसत्राचे आयोजन

नगर – जिल्हा रुग्णालय व जिल्हा आयुष रुग्णालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा आयुष रुग्णालय, अहिल्यानगर येथे योगसत्राचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय घोगरे यांनी दिली आहे.

स्वास्थ्य रक्षणासाठी योग आचरणात आणणे आवश्यक आहे. योग व प्राणायामाच्या सहाय्याने विविध प्रकारच्या आजारांवर नियंत्रण मिळवता येते. नागरिकांनी योगवर्ग व योगोपचार शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले आहे.

तसेच २३ ते २७ जून दरम्यान सायंकाळी ४ ते ५ यावेळेत जिल्हा आयुष रुग्णालय, अहिल्यानगर येथे योग प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे.

योगविद्याधाम संस्थेचे योगतज्ञ योगासने आणि प्राणायामाचे प्रशिक्षण देणार आहेत.

# अहमदनगर महाविद्यालयात पोलिस भरती केंद्राचे उद्घाटन



अहमदनगर महाविद्यालयामध्ये पोलिस भरती मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करताना डॉ. आर. जे. बार्नबस.

नगर – ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी पोलिस भरती मार्गदर्शन केंद्र हे एक महत्त्वाचे व उपयुक्त पाऊल ठरणार असून, या केंद्राच्या माध्यमातून हजारो तरुण–तरुणींना पोलिस सेवेत सहभागी होण्याची दिशा मिळणार आहे, असे प्रतिपादन भा.पां. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी केले.

अहमदनगर महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या पोलिस भरती मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन झाले.

सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आर. जे. बार्नबस हे उपस्थित होते. त्यांनी केंद्राचे उद्घाटन करताना उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, ग्रामीण व शहरी भागातील तरुणांमध्ये पोलिस सेवेत जाण्याची जिद्द आहे. मात्र योग्य मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या मनातील इच्छा अपूर्ण राहते. हे केंद्र त्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे ठरेल. शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक तयारीसाठी येथे सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ते पुढे म्हणाले, आज आपण ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार आहोत. हे उद्घाटन केवळ एका केंद्राचे नसून, एका नव्या युगाची सुरुवात आहे. आपण या केंद्राच्या कार्यक्षमतेत सातत्याने सहकार्य करावे. समाजातील प्रत्येक घटकातील तरुण या केंद्राच्या माध्यमातून पोलिस दलात भरती होऊन सामाजिक सुरक्षा व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पुढे येतील, हीच आमची अपेक्षा आहे. यासोबतच डॉ. बार्नबस यांनी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांचे आभार मानले.

या केंद्रामध्ये दैनंदिन शारीरिक प्रशिक्षण, लेखी परीक्षेसाठी अभ्यासवर्ग, मॉडेल टेस्ट्स, तसेच मानसिक तयारीसाठी व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत. प्रशिक्षणार्थींना योग्य आहार, वैद्यकीय तपासणी व पोलिस भरती संदर्भातील सर्व तांत्रिक माहिती देखील दिली जाणार आहे.

या कार्यक्रमास भा.पां. शिक्षण संस्थेचे सचिव विशाल बार्नबस, प्रमुख प्रशिक्षक आणि सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक राजू वैराळे (अहिल्यानगर) उपस्थित होते. सूत्रसंचालन करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. भागवत परकाळ यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. तुषिता आय्यर (समन्वयक उद्योजकता विकास) यांनी करून दिला. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सविओ वेगास (शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक) यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, विनाअनुदान विभाग प्रमुख डॉ. सय्यद रज्जाक, उपप्राचार्य डॉ. प्रीतमकुमार बेदरकर, रजिस्टर (प्रबंधक) श्रीमती कल्पलता भिंगारदिवे, डॉ. कमलाकर भट, ग्रंथपाल प्रशांत फुगणर, डॉ. अभिजित कुलकर्णी, प्रा. सुरेश घुले, डॉ. सचिन राळेगणकर आदी उपस्थित होते.

# जमात ए इस्लामीतर्फे सर्वधर्मीयांसाठी 'बकरीद उर्फ ईदुल अज्हा' मिलन कार्यक्रम



जमाअते इस्लामी हिंद, नगरतर्फे कासमखानी मशीद येथे सर्वधर्मीय बांधवांसाठी 'बकरीद उर्फ ईदुल अज्हा' मिलन कार्यक्रम झाला.

नगर – जमाअते इस्लामी हिंद, नगरतर्फे कासमखानी मशीद येथे सर्वधर्मीय बांधवांसाठी 'बकरीद उर्फ ईदुल अज्हा' मिलन कार्यक्रम झाला.

प्रास्ताविक करताना डॉ.इक्राम खान यांनी सर्वधर्मीयांना बकरीदची पार्श्वभूमी व संदेश समजाऊन सांगितले. व गैरसमज दूर करणे हा उद्देश असल्याचे स्पष्ट केले.


डॉ. सय्यद रफीक यांनी बकरीद ही प्रेषित इब्राहीम (अ.) माता हाजरा (अ.) व पुत्र इस्माईल (अ.) यांच्या महान त्याग व बलिदाना प्रित्यर्थ साजरी केली जाते हे विषद केले. इब्राहीम (अ.) यांनी तत्कालीन अंधश्रध्दा, अनीष्ठ रूढी–परंपरा व देवा–धर्माच्या नावावर होणाऱ्या जनसामान्यांच्या शोषणा विरूध्द सर्वस्वाने संघर्ष केल्याचे विषद केले. नियतीने त्यांना देवाधर्माच्या नावावर प्रचंड शोषणाचे केंद्र असणाऱ्या श्रीमंत देवस्थानाचे सर्वेसर्वा असणाऱ्या पिता आजर यांच्याच पोटी जन्माला घातले.

इब्राहीम (अ.) यांचा संघर्ष घरातूनच सुरू झाला. त्यांचे उभे जीवन त्यागाचे, कुर्बानीचे प्रतीक आहे. या संघर्षात त्यांना पत्नी सारा (अ.) हाजरा (अ.) पुतण्या लूत (अ.) व मुले अनुक्रमे इस्माईल (अ.) व इसहाक (अ.) यांनी संपूर्ण सहकार्य केल्याचे स्पष्ट केले. इसहाक (अ.) यांच्या वंशातच याकूब (इस्राइल) (अ.), यूसूफ (अ.), मूसा (अ.), मरियम (अ.) व इसा (येशू) (अ.) इ. अनेक प्रेषित जन्मले आणि इस्माईल (अ.) यांच्या वंशात २५०० वर्षांनंतर मक्का येथेच शेवटचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचा जन्म झाला असे नमूद केले.

प्रमुख पाहुणे इंजिनिअर वाजीद अलीखान यांनी आपल्या प्रमुख भाषणात बकरीदचा ४००० वर्षांपूर्वीचा इतिहास विषद केला. प्रेषित इब्राहीम (अ.) व इतर तमाम प्रेषितांचाच वारसा शेवटचे प्रेषित पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विशुध्दपणे पुन्हा जोमाने चालविला व एक आदर्श नागरिक, आदर्श कुटूंब, आदर्श समाज व आदर्श राज्य निर्मितीची मुहूर्तमेढ रोवल्याचे त्यांनी सप्रमाण दाखले देऊन उपस्थितांचे मार्गदर्शन केले. मक्का मशीद ही प्रेषित इब्राहीम (अ.) व इस्माईल (अ.) यांनी ४००० वर्षांपूर्वी मक्का येथे बांधली. जे आजही एकेश्वरवादाचे, समतेचे, विश्वबंधुत्वाचे व शांतीचे केंद्र आहे हे स्पष्ट करून हज्ज यात्रेसाठी त्यांच्याच स्मरणार्थ दरवर्षी जगाच्या कानाकोपऱ्यातून मुस्लिम बांधव एकत्र येऊन समता व बंधूत्वाचे प्रत्यक्ष दर्शन घडवितात इ. अनमोल माहिती दिली.

कार्यक्रमासाठी सावित्री फातेमा सद्भावना मंचाचे अध्यक्ष ॲड. संभाजी बोरुडे, मराठा सेवा संघाचे विठ्ठलराव गुंजाळ, अशोक सब्बन, नवेद बिजापुरे, मुश्ताक सर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, फिरोज शेख व इतर सर्वधर्मीय उपस्थित होते. मुबीन खान यांनी सुत्रसंचालन केले. याप्रसंगी प्रश्नोत्तरासाठी ही संधी दिल्याने अनेक शंका–कुशंकांचे निरसन झाले. जमाअतचे स्थानिक अध्यक्ष सय्यद नईम यांनी आभार मानले.

# निर्मलवारी उपक्रमात नागरिकांनी स्वयंसेवक म्हणून सहभागी व्हावे




नगर – गेल्या वर्षीपासून अहिल्यानगर जिल्ह्यात आषाढी एकादशी निमित्त सेवा भरती, राष्ट्रीय हितसंवर्धक मंडळ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सेवा विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणचा परिसर स्वच्छ रहाण्यासाठी 'निर्मलवारी' संकल्पना व उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमा अंतर्गत दिंडीतील वारकऱ्यांसाठी मुक्कामाच्या ठिकाणी शासनाने पुरवलेले तात्पुरते शौचालय उभारून त्याची व्यवस्था लावण्यात येते. या उपक्रमासाठी स्वयंसेवक म्हणून नागरिकांची गरज आहे. त्यामुळे दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणचा परिसर स्वच्छ रहाण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी निर्मलवारी उपक्रमात स्वयंसेवक म्हणून सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. कृष्णा देहाडराय यांनी केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात येणाऱ्या संत निवृत्तीनाथ महाराजांच्या आषाढी वारी दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी निर्मलवारीचा उपक्रम गेल्या वर्षापासून राबवण्यात येत आहे. या निर्मलवारी उपक्रम राबवण्यासाठी स्वयंसेवक म्हणून जास्तीत जास्त नागरिकांची गरज आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात निर्मलवारी हा उपक्रम २१ ते २८ जून या दरम्यान राबवण्यात येणार आहे. संत निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडीचे आगमन अहिल्यानगरमध्ये २१ जून रोजी डोंगरगण येथे होणार आहे. येथून या निर्मलवारी उपक्रमास सुरुवात होणार असून २८ जून रोजी कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथे या उपक्रमाची सांगता होणार आहे. या भागातील नागरिकांनी स्वयंसेवक म्हणून या उपक्रमात सहभागी व्हावे.

माहितीसाठी व सहभागी होण्यासाठी डॉ. कृष्णा देहाडराय मो.नं. ८८०५९८२०८१, उदय भणगे मो.नं. ९२२६७२४०९२, राहुल गांधी मो.नं. ९८९०१५९६७३ व सुयोग दळवी मो.नं. ८७८८१९३५२५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## डॉ.बोरा क्लिनिकमध्ये केसांच्या समस्यावर मोफत मार्गदर्शन व होमिओपॅथी उपचार



डॉ. प्रतिमा बोरा

नगर – डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिकमध्ये २० जुन ते १५ जुलैपर्यंत सकाळी ११ ते २ व सायंकाळी ५ ते ८ या कालावधीत केसांच्या सर्व समस्यांवर मोफत मार्गदर्शन व होमिओपॅथी उपचार अल्पदरात देण्यात येणार आहे. सुंदर व निरोगी केसांसाठी अतिशय प्रभावी होमिओपॅथी उपचार आहेत. हे सर्वांना माहिती होण्यासाठी होमिओपॅथी औषधावर फक्त ५०० रुपये महिना ही सवलत दिली जाणार अशी माहिती डॉ. प्रतिमा बोरा यांनी दिली.

कमी वयात केस गळणे, कोंडा होणे, चाई लागणे, टक्कल पडणे, अकाली केस पांढरे होणे, वाढ खुंटणे, उवा होणे अशा अनेक समस्या निर्माण होतात. या सर्व समस्यांवर होमिओपॅथी उपचार पद्धती परिणामकारक आहे. अतिशय सुरक्षित, दुष्परिणाम वरहीत, वेदनाविरहीत, खात्रीशीर व दीर्घकालीन उपचार हे होमिओपॅथीचे वैशिष्ट्य आहे. महत्वाचे म्हणजे आहारावरही कोणते बंधन नाही, विना इजेक्शन, विनाशस्त्रक्रिया असलेल्या होमिओपॅथी औषधांचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. डॉ. प्रतिमा बोरा या २१ वर्षापासुन होमिओपॅथी प्रॅक्टीस करत आहेत. रुग्णाची संपूर्ण जीवनशैलीची माहिती घेऊन त्यानुसार समस्येच्या मुळापर्यंत जाऊन ती दूर करण्याचे काम होमिओपॅथी मध्ये होते.

या उपचारांचा व सवलतीचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा. नाव नोंदणी व अधिक माहिती साठी डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक, नक्षत्र मेडिकल मागे, चाणक्य चौक, अहिल्यानगर क्लिनिकमध्ये किंवा ९८२२६४६५८८ यावर संपर्क साधावा.

# भाकपच्या जिल्हा अधिवेशनात शेतकरी, शेतमजूर, श्रमिक कामगारांच्या न्याय हक्कासाठी संघर्षाचा ठराव

### शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करुन स्वामीनाथन समितीच्या शिफारशी लागू करा



कॉ. बन्सी सातपुते कॉ. ॲड. सुधीर टोकेकर कॉ. संतोष खोडदे

नगर – भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन शहरात उत्साहात पार पडले. यात शेतकरी, शेतमजूर, श्रमिक–कामगार, अल्पसंख्यांक व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्याचा ठराव घेण्यात आला. तर पुढील तीन वर्षासाठी जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ.डॉ. राम बाहेती यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशाप्रसंगी महिला फेडरेशनच्या कॉ. स्मिता पानसरे, आप्पासाहेब वाबळे, कॉ. बाबा आरगडे, कॉ. बबनराव सालके, जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड.सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, कॉ. भारती न्यालपेल्ली, ज्ञानेश्वर सहाणे, कॉ. महेबुब सय्यद, कॉ. अनंत लोखंडे, अशोक सब्बन, कॉ. कारभारी उगले, कॉ. भगवान गायकवाड, ॲड. ज्ञानदेव सहाणे, कॉ. सुभाष ठुबे, कॉ. सुरेश पानसरे, कॉ. बापूराव राशिनकर, लक्ष्मण नवले, कॉ. सतिश पवार, कॉ. मारुती सावंत, कॉ. कन्हैय्या बुंदेले आदींसह व प्रत्येक तालुक्यातून प्रतिनीधी सहभागी झाले होते.

भविष्य निर्वाह निधी कायदा १९९५ व १९५२ नुसार निवृत्त झाल्यावर जी पेन्शन मिळते, ती अत्यंत कमी आहे. त्यामध्ये औषधाचा खर्च देखील भागत नाही, म्हणून या सर्व कर्मचाऱ्यांना ५ हजार रुपये पेन्शन दरमहा मिळाली पाहिजेत अशी मागणी करण्यात आली. कामगारांना किमान वेतन मिळाले पाहिजे, यासाठी २६ ते ३० हजार रुपये वेतन श्रमिकांना द्यावे, केंद्र सरकारने कामगारांचे जुने कायदे बदलण्यासाठी बहुमताच्या जोरावर कामगार संहिता कोड लागू केलेले आहे. नवीन कायदे भांडवलदाराच्या बाजूने असल्यामुळे त्याला कामगारांच्या वतीने या अधिवेशनात विरोधत करुन जुने कामगार कायदे कायम ठेवण्यासाठी लढा देण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

गायरान जमिनी वन जमिनी व इतर शासकीय जमिनीवर अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे विनाअट नियमित करून त्यांना पट्टे द्यावेत, शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करावी, शेतीमालाला किमान हमीभावाचा कायदा करण्यात यावा, स्वामीनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करु नये, शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर यांना वयाच्या साठ वर्षानंतर दरमहा पाच हजार रुपये पेन्शन द्यावी, असंघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना किमान वेतन २१ हजार रुपये मिळावे, कामगार विरोधी नवीन चार श्रमसंहिता रद्द करण्यात याव्या, महाराष्ट्र शासनाने जनसुरक्षा विधेयक तात्काळ मागे घ्यावे, बेरोजगारांना नोकरी द्या किंवा बेरोजगार भत्ता द्यावा, महिलांच्या सुरक्षेसाठी कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, आदिवासी व समाज कल्याण विभागाच्या निधी इतरत्र वळवू नये, लाडकी बहिण योजनेसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात यावी, अल्पसंख्यांक व दलित समाजावर होत असलेले हल्ले व दहशतीला आवर घालावा, पिक विमा योजना शेतकऱ्यांच्या हिताची करण्यात यावी आणि सरकारी नीमसरकारी विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्यासाठी भविष्यात सरकारकडे पाठपुरावा करुन वेळप्रसंगी संघर्ष करण्याचा ठराव घेण्यात आला. नाशिक येथे होणाऱ्या पक्षाच्या राज्यस्तरीय त्रैवार्षिक अधिवेशनात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातून प्रतिनिधी देखील यावेळी निवडण्यात आले.

**भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नूतन जिल्हा कार्यकारिणीची निवड**

भाकपच्या जिल्हा त्रैवार्षिक अधिवेशनात जिल्हा कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये जिल्हा सचिव कॉ.बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, कार्यकारिणी सदस्यपदी कॉ.ॲड. सुभाष लांडे, स्मिता पानसरे, भगवान गायकवाड, बाबा अरगडे, लक्ष्मण नवले, निवृत्ती दातीर, प्रताप सहाने, सुरेश पानसरे, कानिफनाथ तांबे, सुनील दुधाडे, भारत आरगडे, भारती न्यालपेल्ली, संदीप इथापे, बबन पाटील सालके, आप्पासाहेब वाबळे यांची निवड करण्यात आली आहे.



भिंगार शहरात साकार होणारे नियोजित पहिले छत्रपती शिवाजी महाराज मंदिराच्या भूमीपूजनाचा शुभारंभ संभाजीराव भिंगारदिवे यांच्या हस्ते करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे भिंगारमध्ये प्रथमच मंदिर होणार

नगर – भिंगार शहरामध्ये प्रथमच छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिराचे बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. या शिव मंदिराच्या स्थापनेसाठी श्यामराव वाघस्कर व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेल्या पाच वर्षापासून अथक घेतलेले आहेत. अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचे मंदिर भिंगार वासीयांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डचे माजी उपाध्यक्ष संभाजीराव भिंगारदिवे यांनी केले आहे.

भिंगार शहर येथील वाघस्कर गल्लीमध्ये श्रीमंत योगी प्रतिष्ठानच्या पुढाकारातून व आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून साकार होणारे नियोजित पहिले छत्रपती शिवाजी महाराज मंदिराच्या भूमीपूजनाचा शुभारंभ संभाजीराव भिंगारदिवे यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. याप्रसंगी प्रतिष्ठानचे संस्थापक शामराव वाघस्कर, सकल मराठा समाजाचे अध्यक्ष राजेश काळे, इंटक चे माजी जिल्हाध्यक्ष ॲड.साहेबराव चौधरी, काँग्रेसचे जिल्हा चिटणीस रिजवान शेख, भाजपाचे माजी शहराध्यक्ष प्रकाश लुणिया, कैलासराव मोहिते, पोपटराव वाघस्कर, राजेंद्र गवळी, संजय झोडगे, प्रदीप भिंगारदिवे, भैय्या बॉक्सर, विशाल कटारनवरे, सिद्धार्थ आढाव, गणेश सातकर, विनायक वाघस्कर, संतोष हजारे, जयदत्त वाघस्कर, मतीन ठाकरे, जनार्दन भिंगारदिवे, समीर शेख, मच्छिंद्र भिंगारदिवे, प्रमोद मोहिते, रवी नन्नवरे, श्रीकांत भालसिंग, संदेश वाघस्कर, मयूर भोईटे, ओंकार दळे, प्रणव वाघस्कर, अनुज कानडे, गणेश श्रीपाद, आकाश तोरडी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात शामराव वाघस्कर म्हणाले, छावणी परिषदेच्या मैदानात युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर उभारणीसाठी गेल्या पाच वर्षापासून पाठपुरावा करण्यात येत आहे. या शिव मंदिराच्या सभागृहासाठी आमदार संग्राम जगताप यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या मंदिराच्या माध्यमातून भव्य दिव्य असे छत्रपती शिवरायांचे स्मारक निर्माण होणार आहे. या मंदिरातून अनेक मोठी समाजकार्य घडतील. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन सिद्धार्थ आढाव यांनी केले. विनायक वाघस्कर यांनी आभार मानले.

# गौतस्करी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार

## जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे प्रतिपादन; निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत गोमाता पूजन व वृक्षारोपण



जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी इसळक येथील निसर्गसृष्टी गोपालन संस्था संचालित ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज गोशाळेस सदिच्छा भेट दिली व त्यांच्या हस्ते गौमाता पूजन व वृक्षारोपण झाले.

नगर – देशी गौवंशाचे संरक्षण करणे ही कायद्याने पोलीस प्रशासनाची जबाबदारी असली तरी आपल्या सारख्या गौसेवकांशिवाय हे कार्य शक्य नाही. निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत आज एवढ्या मोठ्या प्रमाणावर गोवंश सांभाळत आहेत. ही निश्चित कौतुकास्पद बाब आहे. गो तस्करीवर जिल्हा पोलीस प्रशासन तडीपारीसारखी कठोर कारवाई करत आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

इसळक येथील निसर्गसृष्टी गोपालन संस्था संचालित ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज गोशाळेस सदिच्छा भेट दिली व जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते गौमाता पूजन व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी भाजपाचे प्रा.भानुदास बेरड, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष नितीन उदमले, गोशाळाचे अध्यक्ष वैद्य विलास जाधव, सचिव प्रा.गौतम कराळे, खजिनदार गजेंद्र सोनवणे, उपाध्यक्ष विश्वास बेरड, हिंदुराष्ट्र सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय अडोळे, इसळकचे माजी सरपंच संजय गेरंगे, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनिक चौधरी, प्रशांत देठे, डॉ. शशिकांत कारखिले, सहआयुक्त पशुसंवर्धन विभाग, अंकुश गोळी, डॉ. अनिल कराळे, गोशाळा महासंघाचे ललित चोरडिया, हभप रविंद्र महाराज सुद्रिक, हभप दत्तात्रय महाराज बहिरट, मुकुल गंधे, उद्योजक धनंजय जोशी, भाऊसाहेब गायकवाड, उपसरपंच बाळासाहेब कोतकर, शिवाजी खामकर, श्रीनिधी सोमानी, मुख्याध्यापिका संगिता जाजगे, बाळासाहेब म्हस्के, निलेश गेरंगे, महादेव कोकाटे, अमोल बारस्कर, अरविंद बेरड, संतोष घोलप, विशाल भालसिंग, हेमंत कमलापुरकर आदि उपस्थित होते.

गोसेवा सर्वात कठीण काम असून प्रत्यक्ष कत्तल करणाऱ्या लोकांबरोबरच त्यांना जनावरे आणून देणारी एक साखळी मध्ये काम करते त्यामुळे याला संघटित गुन्ह्याचे स्वरूप येते. लोकांनी अश्या पद्धतीने जनावरे विकू नयेत यासाठी देखील संस्थेने प्रबोधन करावे. गो रक्षणासाठी सर्वतो सहकार्य पोलीस प्रशासनाचे राहील याची ग्वाही जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

प्रास्ताविक वैद्य विलास जाधव यांनी तर सुत्रसंचलन गौतम कराळे यांनी केले. मुकुल गंधे यांनी आभार मानले.

# विद्युत पुरवठा करणाऱ्या तारांवर झाडांच्या मोठ्या फांद्या असल्याने नागरिकांचे जीव आले धोक्यात

नगर – मुकुंदनगर, फकीरवाडा परिसरात तमीमदारी मशीद शेजारील असलेल्या जुन्या झाडांमुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहे.

झाडाच्या मोठ्या फांद्यांमुळे विद्युत महावितरणाच्या मुख्य तारांवर फांद्या गेलेल्या आहे. वारा चालू झाला की तारा एकमेकांना चिकटतात व घरांच्या कंपाउंडमध्ये उतरण्याची शक्यता आहे. या फांद्यांमुळे तारा तुटून घरावर किंवा रस्त्यावर पडू शकतात. हा रस्ता वर्दळीचा असून बहुतेक शाळकरी मुले याच रस्त्यावरून ये- जा करतात तसेच धार्मिक स्थळ असल्याने रहदारी असते. या परिसरामध्ये मुख्य विद्युत पुरवठा करणाऱ्या तारांवर असणाऱ्या झाडाच्या फांद्या कापण्याच्या मागणीसाठी विद्युत महावितरण व महानगरपालिका यांच्या कर्मचाऱ्यांशी अनेकदा संपर्क केला. मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. याबाबत माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

लवकरात लवकर झाडांच्या फांद्या कापण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# शांत, संयमी, मितभाषी व्यक्तीमत्वाचे उद्योजक यशस्वी होतातच

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन



रत्नप्रभा ईसुजू या शोरूमच्या शुभारंभ प्रसंगी सतोषी हाशीमोटो, आ. संग्राम जगताप, आबासाहेब थोरात, राजेंद्र निंबाळकर, अरविंद पारगावकर, वेनूगोपाल तन्नाकी, पद्मनाभन, सागर निंबाळकर आदी. (छाया – अमित मन्यार)

## रत्नप्रभा ईसुजू शोरूमचा शुभारंभ

नगर – तंत्रज्ञान दिवसेदिवस एक एक पाऊल पुढे जात आहे. याच आधुनिक क्षेत्रांच्या उमेदीवर मनुष्याच्या सुख–सुविधा अधिक सुलभ सोयीस्कर व आरामदायी होत आहेत. आधूनिक तंत्रज्ञानाचा अविष्कार वाहन जगतात आमुलाग्र बदल घडवित आहे. पूर्वीच्या तुलनेत आजच्या वाहन उद्योगाची भरारी वाखण्याजोगी आहे. अनेक कंपन्यानी वाहनांची दर्जेदार उत्पादाने बाजारात आणली असली तरी या वाहननिर्मिती जगामध्ये वाहन ग्राहकांसाठी मोलाची भूमिका बजावणारे वाहन विक्री उद्योजक हे कंपनीचे नाव तसेच सदर कंपनीस नावलौकीक मिळवून देतात, जे उद्योजक शांत, संयमी व मितभाषी तसेच आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ होऊन सेवा देतात असे उद्योजक यशस्वी होतातच. सागर निंबाळकराचे रत्नप्रभा ईसुजु हे प्रतिभाशाली नाव वाहन क्षेत्रात चमकेल असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी रत्नप्रभा ईसुजुच्या वाहन दालनाच्या शुभारंभ प्रसंगी केले. उद्योजक सागर निंबाळकर यांनी जपान टेक्नोलॉजी निर्मित ईसुजु वाहनचे रत्नप्रभा ईसुजु शोरूमच्या शुभारंभप्रसंगी आ. जगताप बोलत होते.

कार्यक्रमाची सुरवात फित कापून व ईसुजु वाहनाचे इनॉग्रेशन करून करण्यात आली. कार्यक्रमास चंद्रशेखर घुले पाटील, कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट सतोषी हाशीमोटो, एस् आर थोरात उद्योग समुहाचे सीओ आबासाहेब थोरात, प्रमुख पाहुणे राजेंद्र निंबाळकर, श्रायडरचे व्हाईस प्रेसिडेंट अरविंद पारगावकर, इसुजुचे वेनूगोपाल तन्नाकी, पद्मनाभन, संचालक सागर निंबाळकर, एमआईडीसी एपीआय माणिक चौधरी, आमी अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, राजेंद्र कटारिया, संजय बंदिष्टी, मिलींद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

सतोषी हाशीमोटो म्हणाले की, सागर निंबाळकर यांच्या माध्यमातून कंपनीस स्मार्ट बिझनेस पार्टनर मिळाला आहे. कंपनीनिर्मित विविध वाहनांची त्यांच्या अप्रतिम क्षमतेची व इतर स्पर्धेतील वाहनापेक्षा ईसुजुच्या पॅसेंजर प्लस व मालवाहतूक वाहनाचा दणकटपणा विस्तारीत करत ईसुजु वाहनाची कार्यक्षमता सांगितली. रत्नप्रभा मोटर्सला विक्री पश्चात सेवेत कंपनी साथ देईल अशी ग्वाही दिली.

यावेळी चंद्रशेखर घुले पाटील व शालीनीताई विखे पाटील यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

सागर निंबाळकर यांनी सांगितले की ईसुजु जपान कंपनीने रत्नप्रभा मोटर्सवर दाखविलेला विश्वास सार्थ ठरवू. ईसुजुला अहिल्यानगर मध्ये अग्रणी स्थानावर नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील व इसुजु ला वाहन क्षेत्रात नावलौकीक मिळवूण देऊ असे ही त्यांनी सांगितले.

सुत्रसंचालन आर.जे. प्रसन्ना यांनी केले. स्वागत आमीचे राजेंद्र कटारिया, संजय बंदिष्टी, मिलिंद कुलकर्णी व इतर सदस्यांनी केले. मिलींद कुलकर्णी यांनी आभार मानले.

# 'वीर हनुमान पायी दिंडी सोहळ्याचे' नगरमधून २५ जूनला प्रस्थान होणार

नगर – सालाबाद प्रमाणे वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठाण च्या वतीने अहिल्यानगर ते पंढरपूर आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्याचे २५ जूज रोजी सकाळी १० वा. हनुमान मंदिर, मार्केट यार्ड, अहिल्यानगर येथून प्रस्थान होणार आहे, अशी माहिती अध्यक्ष बाबासाहेब जाधव यांनी दिली.

सचिव झुंबर आव्हाड म्हणाले कि मागील २२ वर्षांपासून आम्ही या दिंडी सोहळ्याचे आयोजन करत आलो आहोत. दिंडी अतिशय शिस्तबद्ध व वेळेचे पालन करणारी आहे. यामध्ये जर भाविकांना सहभागी व्हायचे असेल तर त्यांनी या मोबाईल नंबरवर ९४०५००१४७४, ९४०४६१५१५१, ९५८८२६३१३१, ९९२३६८११२२ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिंडी यशस्वीते साठी अध्यक्ष बाबासाहेब जाधव यांचे सहकार्य मिळत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष राजेंद्र कानडे, सचिव झुंबर आव्हाड, विक्रांत राऊत, संजय महापुरे, छबुराव गाडळकर, रामदास कानडे, गोविंद सांगळे, भीमराज रासकर, यशवंत ओटी, मोहन रासकर, शंकर रासकर, नंदू गाडळकर, मनोज आजबे, राहुल इवळे आदी प्रयन्तशील आहे. तसेच या दिंडी काळात श्री विशाल गणेश मंदिर चे महंत संगमनाथजी महाराज या दिंडीत सहभागी होणार आहेत.

या दिंडी कालावधीत रोज कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच श्रीराम भक्त सत्संग सेवा मंडळ च्या वतने हनुमान चालीसा पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र भक्त सेवा ट्रस्ट अहिल्यानगर यांच्या वतीने ७ जुले रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पद्मशाली समाजभूषण : कै. गुरुवर्य पोट्यन्ना पापय्या बत्तीन



(२० जून जयंतीनिमित्त)

'सेस्ते आवुत दि सुस्ते कादु' या उक्तीप्रमाणे आधी केले पाहिजे मगच कार्य सिद्धीस जाते. हे ब्रीद आयुष्यभर जपून कै. गुरुवर्यं पोट्यन्ना बत्तीन यांनी समाजासाठी कार्य केले. २० जून रोजी त्यांची १३७ वी जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा अगदी थोडक्यात आढावा घेणे समाजासाठी खूपच आवश्यक आहे.

पद्मशाली समाजातील पहिले पदवीधर म्हणून कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तीन यांचे कार्य पद्मशाली सम ाजासाठी खूपच आदर्शवत राहिले आहे. प्रत्येक समाजात कर्तृत्ववान व्यक्ती उदयास आलेल्या दिसून येतात. राष्ट्रपिता महात्मा गांधींपासून अण्णा हजारे, पोपटराव पवार यांसारखी नावे यासंदर्भात सांगता येतील. कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तीन यांचा देखील त्याच मांदियाळीत समावेश होतो. ज्यांनी आपल्या अफाट कार्यकर्तृत्वाने पद्मशाली समाजाला जागृत केले व याच्या शैक्षणिक प्रगतीचा मार्ग सुकर केला.

सन १८६१ साली आंध्रप्रदेशात कायोरङ्डी स्टेशनजवळील चिक्कूलामल्लयरेडी या गावाहून उदरनिर्वाहासाठी त्यांचा परिवार आपल्या अहिल्यानगरमध्ये दाखल झाले. २० जून १८८८ रोजी पोट्यन्ना यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच १९०१ साली त्यांचे पितृछत्र हरपले. आजही चितळेरोड येथील 'पापय्या गल्ली' या नावाने स्मरण होते. पोट्यन्ना यांची हुशारी व कुशाग्र बुद्धिमत्ता अगदी लहानपणात दिसून आली. इयत्ता ४थीत असतानाच मिडल स्कूल स्कॉलरशीप मिळवली.

ज्या काळात पद्मशाली समाजात शिक्षणाचे महत्त्व नव्हते, शिक्षणाचा प्रसार नव्हता अशा काळात एका विणकर कुटुंबातील तेलगु भाषिक मुलगा आपल्या कर्तृत्वाने शिक्षणात प्रगती करीत होता, ही बाब अत्यंत अभिमानास्पद व आश्चर्यकारक होती.

त्या काळातील रूढीप्रमाणे त्यांचे शिक्षण चालू असतानाच त्यांचा विवाह १५ व्या वर्षी १९०३ साली कै. म्याना लालय्या यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याबरोबर झाला. कौटुंबिक जबाबदारी सांभाळत त्यांनी शिक्षणात खंड पडू दिला नाही. प्रा. महादेव मल्हार जोशी यांच्या प्रेरणेने व रँग्लर परांजपे यांचे मार्गदर्शनाने व सहकार्याने पोट्यन्ना बत्तीन हे फर्ग्युसन कॉलेजमधून इ.स. १९०९ साली बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. पोट्यन्ना पद्मशाली समाजात अखिल भारतात पहिले पदवीधर म्हणून ओळखले जातात.

आपण मिळवलेल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा उपयोग समाजासाठी सुद्धा व्हावा. त्यांनी इतर नोकरीच्या उच्चपदस्थ नोकरी न पत्करता 'शिक्षकीपेशा' पत्करला. या नोकरीच्या निमित्ताने अनेक शहरातून फिरावे लागले. इ.स. १९१४ साली ते एस.टी.सी.डी. परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली. शिक्षकी पेशात असतांना त्यांनी आपल्या कार्यपद्धतीचा ठसा ठळकपणे उमटविला. सचोटी, कष्ट, चिकाटी, व्यासंग ही त्यांची वैशिष्ट्ये ठरली. त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल मत व्यक्त करताना मुख्याध्यापक कै. नारायण बनहट्टी यांनी पोट्यन्ना बत्तीन यांच्या लॉगबुकात त्यांच्या कार्यावर देखरेखीची आवश्यकता नाही (His work requires no supervision) असा गौरवपूर्ण शेरा दिला. यावरूनच त्यांची कर्तव्यनिष्ठा व कार्याविषयी तळमळ दिसून येते. त्यांची शैक्षणिक कारकिर्द बहरतच गेली. पुढे ते पुणे व आपल्या अहिल्यानगरचे ट्रेनिंग स्कूलचे प्राचार्य झाले व त्यासाठी खूप कष्ट घेतले.

दुर्दम्य ज्ञानलालसा आणि अथक परिश्रमशिलता या गुणवैशिष्ट्यामुळे त्यांनी अनेक शिक्षण संस्थांची व सामाजिक संस्थांची निर्मिती केली. सन १९२० मध्ये अहिल्यानगर येथे 'पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची' स्थापना केली व पद्मशाली समाजातील शैक्षणिक प्रगतीचे आद्य प्रणेतके ठरले. 'शिका व संघटित व्हा' हा मंत्र समाजाला दिला.

त्यांच्याकडे दूरदृष्टी असल्यामुळे केवळ शिक्षणाबरोबरच त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत अहिल्यानगर येथे पद्मशाली पंचकमेटी स्थापन केली. पद्मशाली समाज संघटित झाला. समाजाची प्रगती होणेसाठी म्युनिसिपालिटीमध्ये आपल्या समाजाचे प्रतिनिधी पाठवणे आवश्यक आहे हे मत ठामपणे त्यांनी मांडले व तशी कार्यवाही केली. निवृत्तीनंतरही त्यांचे समाजसेवेचे कार्य व मार्गदर्शन सतत चालू होते. सोलापूर, पुणे, मुंबई अशा मोठ्या शहरातील पद्मशाली समाज पोट्यान्नांना मार्गदर्शनासाठी निमंत्रण देत त्यांनी समाजप्रबोधनासाठी १९१७ ते १९२० या काळात 'तेलगू समाचार' मध्ये लेख लिहिले. त्यांनी लेखाद्वारे समाजबांधवांना बहुमोल असे मार्गदर्शन केले.

पोट्यान्नांवर कौटुंबिक दुःखाचे डोंगर कोसळले तरी देखील त्यांची एकाग्रता ढळली नाही. समाजसेवेचे व्रत सोडले नाही. आपल्या भविष्यनिर्वाह निधीची सर्व रक्कम 'पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाला' शैक्षणिक कार्याला देऊन त्यांनी समाजासाठी आदर्श दाखवून दिला. ज्ञानाची शिखरे गाठून सुद्धा साधेपणाने रहाणारा हा माणूस होता. आपल्या सर्वांसाठी ते ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व होते. ते पद्मशाली समाजासाठी प्रामाणिक व समाजाचे मूर्तिमंत प्रतिक होते.

त्यांचे विचार समाजासाठी कायमच प्रेरणादायी ठरले. चांगले करीत रहावे, चांगले म्हटल्यास उत्तम वाईट म्हटले तर पर्वा करू नये. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन! जय श्री मार्कंडेय!

**– कृष्णा संभार**, मो. ९९२२१८९९३८ व्यवस्थापक, दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, पोखर्डी शाखा, ता. नगर.



















# पेन्शनर्सना वेळेत पेन्शन अदा करा

## जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे आदेश; नियमाप्रमाणे हक्क मिळवून देण्याची जबाबदारी प्रशासनाची

नगर – पेन्शनर्सना त्यांचे नियमाप्रमाणे हक्क मिळवून देण्याची जबाबदारी प्रशासनाची असल्याचे स्पष्ट करुन कोणतीही अडचण येणार नसल्याचे आश्वासन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिले.



अहिल्यानगर जिल्हा परिषद आयोजित पेन्शनर्स अदालत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य यांच्या उपस्थितीत झालेल्या पेन्शनर्स अदालतसाठी शिक्षण अधिकारी भास्कर पाटील, वित्तलेखा अधिकारी शैलेश मोरे, लेखा अधिकारी भालेराव, उपशिक्षणाधिकारी शिवगुंडे यांच्यासह नगर जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी आणि जिल्ह्यातील संघटनेचे पेन्शनर्स सदस्य उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की, निधी वेळेवर येत असेल, तर पेन्शनर यांना ५ तारखेनंतर वेळेत पेन्शन दिलीच गेली पाहिजे. यासाठी वेगळे आदेश देण्याची गरज नाही. सेवा जेष्ठतेनुसार यादी तयार करुन प्राधान्य निश्चित करून पेन्शनर्सना लाभ देण्याचे त्यांनी सूचना केल्या.

जिल्हा परिषद अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने नव्याने हजर झालेले मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी व एक वर्ष वाढ मिळालेले शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या अदालतमध्ये निवड श्रेणी प्रस्ताव, सेवानिवृत्त व अंश राशीकरण, उपदान, गट विमा, संगणक कपाती इत्यादी संबंधित सेवानिवृत्तांनी प्रश्न मांडून त्यावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनचे दशरथ ठुबे, सरचिटणीस बन्सी उबाळे, कार्याध्यक्ष रावसाहेब पवार, उपाध्यक्ष विनायक कोल्हे, सुखदेव वांडेकर, ज्ञानदेव लंके, धोंडीबा गांगर्डे, सोमनाथ कळसकर, बापूसाहेब कर्पे, कारभारी शिकारे, भाऊसाहेब लावरे, ज्ञानदेव थोरात, रामचंद्र ठोंबरे, भाऊसाहेब गोरे, अविनाश गांगर्डे, प्रताप आंब्रे, बेबीताई तोडमल, शामला साठे, निनाबाई जोंधळे, गजानन ढवळे, मुरलीधर देशमुख आदींसह जिल्ह्यातील पेन्शनर उपस्थित होते.

बन्सी उबाळे यांनी एकत्र आल्याशिवाय प्रश्न सुटणार नसल्याचे सांगून संघटनेच्या पाठपुराव्याने प्रश्न सुटत असल्याचे स्पष्ट केले. दशरथ ठुबे यांनी वेतन वाढच्या कापलेल्या रकमा देण्याचे आदेश शिक्षणाधिकारी यांनी दिले आहे. सेवा पुस्तकावरून निवड श्रेणीचे काम केले जाणार असल्याचे आश्वासन देण्यात आले असून, उर्वरीत प्रश्न सोडविण्यास संघटनेचा पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूर्यभान काळे, बबन कुलट, भीमसेन चत्तर, सुनील घोलप, तुकाराम ठाणगे, भाऊसाहेब काळे, निळकंठ बोर्डे यांनी परिश्रम घेतले.

## संशयितरित्या फिरणाऱ्यास कल्याण रोडवर पकडले

नगर – रात्रीच्या अंधारात संशयीतरित्या फिरणाऱ्या तरुणास तोफखाना पोलिसांनी पकडले. ही कारवाई नगर कल्याण रोडवरील शिवाजीनगर येथील पेट्रोल पंपाजवळ १८ जून रोजी करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी की तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार भानुदास खेडकर, पो. कॉ. सुमित गवळी हे रात्री तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिवाजी नगर कल्याण रोड येथे पेट्रोलींग करीत असताना एक इसम संशयितरित्या फिरताना मिळुन आला. पोलिसांनी त्यास पकडून त्याचे नाव विचारले असता त्याने मनोज गोरख मांजरे (वय २६, रा.शिवाजीनगर कल्याणरोड, अ.नगर) असे सांगितले व त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तर दिली. त्यामुळे या प्रकरणी पो. कॉ. सुमित गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मनोज मांजरे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शहरातील परमीट नसललेल्या रिक्षा शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

# शहरातील परमिट नसलेल्या २३ प्रवासी रिक्षांवर कारवाई

नगर –प्रवासी वाहतुकीचा परवाना न घेता व परवान्याची मुदत संपूनही त्याचे नूतनीकरण न करता, प्रवासी वाहतूक करणाऱ्या २३ रिक्षा शहर वाहतूक शाखेच्या पथकाने कारवाई करून जप्त केल्या आहेत.

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानंतर शहर वाहतूक शाखा ॲक्टिव्ह झाल्याचे चित्र आहे. अहिल्यानगर शहरात अवैधरित्या १५ वर्षांनंतरही परवाना नूतनीकरण न करता व प्रवासी वाहतुकीचा परवाना न घेता मोठ्या संख्येने वाहने प्रवासी वाहतूक करीत असल्याची माहिती वाहतूक शाखेला मिळाली होती. त्यानुसार वाहतूक शाखेच्या पथकाने शहरातील रेल्वे स्टेशन, तारकपूर, माळीवाडा बस स्थानक, पुणे बस स्थानक, डीएसपी चौक आदी परिसरात पेट्रोलिंग करून परवाना नसलेल्या व नोंदणीचे नूतनीकरण न केलेल्या २३ प्रवासी रिक्षा शोधून जप्त केल्या.

पुढील कारवाईसाठी प्रादेशिक परिवहन विभाग, अहिल्यानगर येथे या रिक्षा पाठविल्या आहेत. पोलिस निरिक्षक बाबासाहेब बोरसे, उपनिरीक्षक आण्णासाहेब परदेशी, उपनिरीक्षक संजय गवळी, उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड, स.फौ. मन्सुर सय्यद आर्दीसह पथकांनी ही कारवाई केली.

# माळीवाडा बसस्थानकात प्रवाशाचा खिसा कापला; ५० हजारांची रोकड लंपास

नगर – माळीवाडा बसस्थानक येथून लग्न समारंभाकरीता कोपरगाव येथे जात असलेल्या वृद्धाच्या खिशातील ५० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत लंपास केल्याची घटना १८ जून रोजी दुपारी सव्वा एकच्या सुमारास घडली.

या बाबत दत्तात्रय मुरलीधर गावडे (वय ६०, रा. गावडेवाडी, ढवळपुरी, ता. पारनेर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी गावडे हे त्यांचा नातू गौरव व सून प्रियंका यांच्यासह कोपरगाव येथे नातेवाईकाच्या लग्न समारंभाकरिता जाण्यासाठी माळीवाडा बसस्थानक येथे गेले होते. तेथे ते कोपरगावकडे जाणाऱ्या बसची वाट पाहत होते. दुपारी नाशिकला जाणारी एसटी बस लागल्याने त्या बसमध्ये बसण्याकरिता गर्दीतून आत प्रवेश करीत असताना अनोळखी तरुणाने (वय अंदाजे २० वर्षे, अंगात लाल शर्ट घातलेला) त्यांच्या खिशातील ५० हजार रुपये काढून चोरुन नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी ताबडतोब आरडाओरडा करून त्याचा पाठलाग केला असता तो गर्दीत कुठेतरी पसार झाला.

त्यानंतर दत्तात्रय गावडे यांनी याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## कामरगाव परिसरातून अल्पवयीन मुलाचे अपहरण

नगर – सोळा वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण केल्याची घटना नगर तालुक्यातील कामरगाव येथे १२ जून रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली.

सकाळपासून बाहेर गेलेला सोळा वर्षीय अल्पवयीन मुलगा संध्याकाळपर्यंत घरी न आल्याने त्याच्या घरच्यांनी त्याचा कामरगाव परिसरात शोध घेतला असता तो कोठेही मिळून आला नाही. यावरून बेपत्ता मुलाच्या चुलत्याने नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एकनाथ आव्हाड हे करीत आहेत.

# क्षयरोग नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना राबवा

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे निर्देश; प्रधानमंत्री कार्यालयाचे उपसचिव डॉ.विपीन कुमार यांचा जिल्ह्यातील आरोग्य केंद्रांना भेटी

नगर – ग्रामीण व शहरी भागांतील क्षयरोगाच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन क्षयरुग्ण शोध मोहीम अधिक प्रभावीपणे राबवावी, औषधोपचाराचा नियमित पाठपुरावा करावा व मृत्यूदर कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि अधिकारीवर्ग.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रधानमंत्री कार्यालयाचे उपसचिव डॉ. विपीन कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, सहसंचालक (क्षयरोग व कुष्ठरोग) पुणे डॉ. संदीप सांगळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, महानगर आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अविनाश आहेर व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. साहिल शेख उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, क्षयरुग्णांचे लवकर निदान करून उपचार सुरू होणे आवश्यक आहे. यासाठी शोध मोहिमा गतीमान कराव्यात. क्षयरुग्णांसाठी आवश्यक औषधांचा नियमित पुरवठा व पाठपुरावा करून बरे होण्याचा दर वाढवावा. मृत्यूदर कमी करण्यासाठी आरोग्य यंत्रणांनी एकत्रित प्रयत्न करावेत.

या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री कार्यालयाचे उपसचिव डॉ. विपीन कुमार यांनी पारनेर तालुक्यातील सुपा येथील आयुष्यमान आरोग्य मंदिर, जिल्हा क्षयरोग केंद्र, आपला दवाखाना नालेगाव, वांबोरी (ता. राहुरी) येथील ग्रामीण रुग्णालय व देहरे (ता. नगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट देऊन तेथील क्षयरोग नियंत्रण उपाययोजनांची पाहणी केली. त्यांनी कामकाजाची माहिती घेतली व आवश्यक सूचना दिल्या.

दौऱ्यादरम्यान जिल्हा क्षयरोग केंद्र, अहिल्यानगर येथे सहा क्षयरुग्णांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. तसेच 'निक्षय मित्र' उपक्रमांतर्गत योगदान देणाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्यास अटक

नगर – रात्रीच्या वेळी काहीतरी गुन्हा करण्याचे उद्देशाने तोंडाला रुमाल बांधुन स्वतःचे अस्तित्व लपवुन संशयिरित्या फिरणाऱ्या तरुणास नगर तालुका पोलिसांनी पकडले. ही कारवाई १८ जून रोजी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास नगर तालुक्यातील चास गावात केली. सुपेश हिरामण महंतो (वय २५, चंपारण, राज्य बिहार, ह.रा. चास ता.नगर) असे पकडलेल्या तरुणाचे नाव आहे.

या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार शिवाजी खरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुपेश महंतो याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सावेडी भागात ५०० बहुपयोगी झाडे लाऊन संगोपन करण्याचे उद्दिष्ट

## सीए ज्ञानेश्वर काळे यांचे प्रतिपादन; 'एक पेड माँ के नाम' उपक्रमा भाजपा सावेडी मंडलाचा उपक्रम

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यकाळास यशस्वीपणे ११ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने शहरात विविध उपक्रम राबवले जात आहेत. या निमित्त सावेडी भागात 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण मोहीम हाती घेण्यात आली असून सावेडी भागात ५०० बहुपयोगी झाडे लावून त्यांचे संगोपन करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ झाला आहे, अशी माहिती सीए ज्ञानेश्वर काळे यांनी दिली.



भाजपच्या सावेडी मंडलाच्यावतीने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

भारतीय जनता पार्टीच्या सावेडी मंडलाच्यावतीने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत सावेडी उपनगरात वृक्षारोपण करण्यात आले. विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे व शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते विविध झाडे लावण्यात आली. यावेळी सावेडी मंडल अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे, विनायक देशमुख, माजी नगरसेवक धनंजय जाधव, निखिल वारे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, भिंगार मंडल अध्यक्ष सचिन जाधव, अशोक गायकवाड, महेश नामदे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

अनिल मोहिते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात आपला देश वेगाने पुढे जात आहे. त्यांच्या या भारत विकास यात्रेत सर्व भाजपचे पदाधिकारी सामील आहेत. पंतप्रधान मोदींनी सुरु केलेल्या सर्व योजनांचा लाभ प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत जाण्यासाठी शहरातील पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. सावेडी मंडलने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमासाठी चांगला पुढाकार घेतला आहे.

यावेळी भाजपचे अजय चितळे, अमोल निस्ताने, महेश तवले, महेश लोंढे, मनोज ताठे, साहिल शेख, महेंद्र जाखेटे, विशारद पेटकर, अनिल ढवण, रवींद्र बारस्कर, बाळासाहेब गायकवाड, करण कराळे, सुहास पाथरकर, बाळासाहेब भुजबळ, करण डापसे, संतोष गांधी, नितीन शेलार, सोमनाथ जाधव, राजेंद्र फुलारे, दत्ता गाडळकर, रामदास आंधळे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# तृतीयपंथीयांच्या कल्याणार्थ शासकीय यंत्रणांनी प्रभावी भूमिका बजावण्यासाठी अहिल्यानगरमध्ये विभाग प्रमुखांसाठी २० जूनला विशेष कार्यशाळा

नगर – तृतीयपंथीयांना सामान्य नागरिकांप्रमाणे वागणूक मिळावी, समुदायाशी संबंधित सामाजिक समावेश, सक्षमीकरण आणि त्यांच्या कल्याणासाठी शासकीय यंत्रणांनी अधिक प्रभावी भूमिका बजावण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालयात २० जून रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय विभाग प्रमुखांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार यांनी दिली आहे.

तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तृतीयपंथीय तक्रार निवार समिती कार्यरत आहे. या कार्यशाळेतून तृतीयपंथीयांची ओळख, त्यांच्या समस्यांची जाणीव तसेच तृतीयपंथीयांविषयी संवेदनशीलता निर्माण करत त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देऊन विविध शासकीय योजनांमध्ये समाविष्ट करुन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत प्रमुख व्याख्याता म्हणून लेखिका, कवयित्री व दिशा पिंकी शेख मार्गदर्शन करणार आहेत.

सर्व विभाग प्रमुखांनी या कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे आवाहनही श्री. कोरगंटीवार यांनी केले आहे.

## घरासमोर लावलेल्या दुचाकीची चोरी

नगर – नगर तालुक्यातील इसळक येथे घरासमोर रस्त्याच्या कडेला हँडल लॉक करून लावलेली होंडा कंपनीचे शाईन मोटरसायकल (क्र. एम एच १६ डी एच ७२५१) अज्ञात चोरट्यानी चोरुन नेली.

याप्रकरणी साहेबराव केशव गिरंगे (वय ५७, रा. इसळक ता. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत.


## जाहीर नोटीस

**तमाम लोकास जाहीर नोटीस द्वारे कळवण्यात येते की**
**मिळकतीचे वर्णन**

डि.अहमदनगर ता.नगर गाव दरेवाडी सर्वे नं ४६ याचे क्षेत्र २२ एकर ३९ गुंठे ही पुर्ण मिळकत आमचे आशिल **श्री. रमेश धोंडीराम भिंगारदिवे** रा. आंबेडकर कॉलनी, पाथर्डी रोड, भिंगार, अ.नगर ४१३२०१ यांची वडिलोपार्जित मिळकत असून सदर मिळकतीचे खालील प्रमाणे पोट हिस्से झाले असुन.

| स. नं | हे. आर | स. नं | हे. आर |
|---|---|---|---|
| ४६/१ | ३. ०१, | ४६ / २अ | २.२० |
| ४६ / २ब | २.२० | ४६/२क | १.४७ |

सदर नमुद केलेली मिळकत ही महार वतन ६ ची इनामी मिळकत होती व आहे सदर मिळकतीस आज रोजी पर्यंत कोणत्याही प्रकारचा आपसात वाटप झालेली नाही व ही मिळकत ईनाम वर्ग ६ असून ही मिळकत विकण्याचा कायदेशीर प्रतिबंधक आहे.

त्यामुळे तमाम लोकांस कळविण्यात येते की, सदरील मिळकती बाबत कोणीही कुठल्याही प्रकारची खरेदी विक्रीचा आर्थिक व्यवहार अथवा देणार घेणार करू नये व त्यामुळे कोणाचही आर्थिक फसगत होऊ नये या प्रामाणिक हेतुने आमचे आशिल प्रस्तुत जाहिर नोटीस उत्तरद्वारे की सदरील मिळकती बाबत कुठल्याही प्रकारे खरेदी विक्रीचा आर्थिक व्यवहार व करार इत्यादी करू नये अगर केल्यास तो आमचे आशिलांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबधीतांना मिळकतीमध्ये कुठलेही कायदेशीर हक्क व अधिकार मुळीच प्राप्त होणार नाही याची नोंद घ्यावी तसेच होणाऱ्या परिणामाची आणि खर्चाची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील आपली फसगत होवु नये व आमच्या आशिलांच्या कायदेशीर हक्क अधिकारामध्ये गुंतागुंत निर्माण होणार होवु नये. आमचे आशिलांच्या कायदेशीर हक्क अधिकारास बाधा येवु नये म्हणुन सदरचे जाहिर नोटीस देत आहे.

अहमदनगर
दि. १९/०६/२०२५

नोटीस देणार
श्री. रमेश धोंडीराम भिंगारदिवे

**ॲड. निलो सलिम सय्यद**
रा गोविंदपुरा,अहमदनगर
मो नं ९३७३६३९८०६


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक विद्यालयामध्ये समग्र शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक वाटप कार्यक्रम पार पडला.

# डॉ. पी. ए. इनामदार विद्यालयात मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप

नगर – एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक विद्यालयामध्ये समग्र शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक वाटप कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाला समिती चेअरमन अनिल साळुंके तसेच प्रमुख पाहुणे म्हणून साहेबराव शिंगाडे व संध्या शिवाजी कर्डिले हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व नवीन पुस्तके वितरित करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. नवगतांचे स्वागत पेन वाटप करून करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष एन. ए. पठाण, तसेच शाला समिती सदस्य लक्ष्मीकांत गरड, देविदास डहाळे, समीर पठाण, शाळेच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, महाराष्ट्र जुनियर कॉलेजचे प्राचार्य शुभम टेमकर, गुरुकूल स्कूलच्या प्राचार्या दिप्ती कराळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन सबा शेख यांनी केले.

## विवाहितेवर सामुहिक अत्याचार

नगर – १८ वर्षीय विवाहितेवर चार इसमांनी घरात घुसून सामुहिक अत्याचार केल्याची घटना केडगावात १८ जून रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. पीडितेवर जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू असून संशयित पसार झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, शहर विभागाचे उपअधीक्षक अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व तेजश्री थोरात यांनी घटनास्थळी व जिल्हा रूग्णालयात धाव घेतली. या प्रकरणी ४ अनोळखी व्यक्तींविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ.विखे पाटील कृषि महाविद्यालयतर्फे नारायण डोहो येथे शेतकरी चर्चासत्र

नगर – विळद घाट येथील डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालयातर्फे ग्रामीण कृषि जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम २०२५–२६ अंतर्गत नारायण डोहो (ता.नगर) येथे शेतकरी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच श्रीमती श्रद्धाताई साठे तसेच प्रमुख व्याख्याते म्हणून उपविभागीय कृषि अधिकारी दत्तात्रय डमाळे, प्रा. डॉ. हरिभाऊ शिरसाठ, सहाय्यक कृषि अधिकारी अनिल तोरकड तसेच स्वाल अँग्रो केमिकलचे टेरोटरी मॅनेजर बाबुराव महाजन उपस्थित होते.



डॉ.विखे पाटील कृषि महाविद्यालयतर्फे शेतकरी चर्चासत्र घेण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून वाळकी मंडळ कृषि अधिकारी नारायण करांडे, उप कृषि अधिकारी संजय बोरुडे, तलाठी कैलास बहीर, ग्रामपंचायत सदस्य नीलुकिसन ठोबरे, कृषि महाविद्यालयाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. के. एस. दांगडे तसेच या कार्यक्रमासाठी गावातील शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना उपविभागीय कृषि अधिकारी दत्तात्रय डमाळे यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. सहयोगी प्राध्यापक डॉ. एच. एल. शिरसाठ यांनी खरीप हंगाम नियोजन याबाबत मार्गदर्शन केले. मंडळ कृषि अधिकारी नारायण करांडे यांनी शेतकऱ्यांच्या शंकेचे निरासन केले. तसेच सहयायक कृषि अधिकारी अनिल तोरकड यांनी गावातील शेतकऱ्यांनी शासनाच्या कृषि योजनांचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले. तसेच उपकृषि अधिकारी संजय बोरुडे यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवावे व सेंद्रिय शेतीचे महत्व सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रा. सुनिल कल्लापुरे, प्राचार्य डॉ. सोमेश्वर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक प्रा.के.एस. दांगडे यांनी केले. सूत्रसंचालन कृषीदूत सौरभ नांद्रे व आभार प्रदर्शन नारायणडोहो गावचे शेतकरी पोपटराव साठे यांनी केले. शेतकरी चर्चासत्र यशस्वीतेसाठी कृषिदूत साई मोहिते, संकेत खरसडे, सागर मुंगसे व शिवम जपकर यांनी परिश्रम घेतले.

